रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ८४
www.ramprahar.com

बुधवार, ११ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

महायुतीतील तीन पक्षांतर्फे लवकरच महासंवाद दौरा/२
शिशिर धारकरांवर दावा दाखल करणार -खासदार तटकरे/५
वर्ल्डकपमध्ये आज भारत वि. अफगाणिस्तान सामना/८

## नोबेल विजेते अमर्त्य सेन यांच्या निधनाची अफवा



**मुंबई :** प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य सेन यांच्या निधनाची बातमी खोटी असल्याचे समोर आले आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना त्यांची मुलगी नंदना देब सेन यांनी अमर्त्य सेन यांच्या मृत्यूच्या वृत्ताचे खंडन केले तसेच ते पूर्णतः ठणठणीत असल्याचे सांगितले. अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेत्या क्लॉडिया गोल्डिन यांच्या नावाच्या व्हेरिफाइड नसलेल्या खात्यावरून मंगळवारी (दि. १०) संध्याकाळी ५ वाजता अमर्त्य सेन यांच्या निधनाची माहिती सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली गेली. याच पोस्टचा हवाला देत आधी पीटीआय या वृत्तसंस्थेनेही मृत्यूची माहिती दिली होती, परंतु ही अफवा पसरताच अमर्त्य सेन यांच्या चाहत्यांमध्ये अस्वस्थता पसरली आणि लगेचच त्यांची मुलगी नंदना देब सेन हिने त्या वृत्ताचे खंडन केले. यानंतर पीटीआयनेही आधी केलेली पोस्ट हटवली.

# महाविजय 2024 : भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आज पनवेलमध्ये

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाविजय २०२४च्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा बुधवारी (दि. ११) पनवेलमध्ये संघटनात्मक दौरा होणार आहे. या दौऱ्याची सर्व तयारी पूर्ण झाली असून प्रदेशाध्यक्षांचे पनवेल नगरीत जोरदार स्वागत करण्यात येणार आहे.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीकरिता संपूर्ण देशभरात महाविजय २०२४ अंतर्गत लोकसभा मतदारसंघाची बांधणी सुरू आहे. आगामी निवडणुकीसाठी भाजपने राष्ट्रीय पातळीवर ४०० प्लस, तर महाराष्ट्रात ४५पेक्षा जास्त जागांवर विजय मिळवण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे. त्या अनुषंगाने भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदारसंघात प्रवास सुरू आहे. त्यातील एक भाग असलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात बुधवारी त्यांचा दौरा होणार असून त्यांच्या या दौऱ्याच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सकाळी १० वाजता पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून या दौऱ्याला सुरुवात करणार आहेत. त्यानंतर पनवेल शहरात घर घर चलो संपर्क अभियान व मेरी माटी, मेरा देश अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात प्रदेशाध्यक्षांसोबत पनवेल, उरण, कर्जत या तीनही विधानसभेतील हजारो कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. त्या अनुषंगाने होणारी ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून हुतात्मा हिरवे गुरुजी चौक, विरुपाक्ष मंदिर, रोनक झेरॉक्स कॉर्नर, त्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा अशी मार्गक्रमण करणार आहे. या ठिकाणी कॉर्नर सभा होणार आहे. त्यानंतर ते पत्रकारांशी संवाद साधणार आहेत. त्याचबरोबर ते पनवेलमधील काही परिवारांच्या भेटी घेणार आहेत.

पक्षाची माहिती, ध्येय धोरणे बूथमधील शेवटच्या नागरिकांपर्यंत माहिती व्हावी याकरिता विधानसभा मतदारसंघातील तीन ते चार बूथची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आलेल्या विधानसभा वॉरियर्सची बैठक स्वतः प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे पनवेल शहरातील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात घेणार आहेत. या दौऱ्याची सर्व तयारी पूर्ण झाली असून प्रदेशाध्यक्षांचे पनवेल नगरीत जोरदार स्वागत करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्ते सज्ज झाले असल्याची माहिती मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी दिली.

# राज्यात लेक लाडकी योजना

### मंत्रिमंडळाचा निर्णय; मुलींना करणार लखपती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (दि. १०) झालेल्या बैठकीत विविध निर्णय झाले. यामध्ये राज्यात मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना राबवून गरीब कुटुंबातील मुलींना लखपती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर पाच हजार रुपये, इयत्ता पहिलीत गेल्यावर सहा हजार रुपये, सहावीत गेल्यावर सात हजार रुपये, अकरावीत गेल्यावर आठ हजार रुपये, १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये अशा रितीने एकूण त्या मुलीस एक लाख एक हजार रुपये एवढा लाभ मिळेल.

या संदर्भात अर्थसंकल्पीय भाषणात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली होती.



माझी कन्या भाग्यश्री ही योजना अधिक्रमित करून १ एप्रिल २०२३ पासून जन्मणाऱ्या मुलींसाठी ही योजना राबविण्यात येईल.

मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देऊन त्यांचा जन्मदर वाढविणे, मुलींच्या शिक्षणास चालना देणे, मुलींचा मृत्यूदर कमी करणे व बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे आणि मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे यासाठी ही योजना राबविण्यात येईल. १ एप्रिल २०२३नंतर कुटुंबात जन्मणाऱ्या एक अथवा दोन मुलींना त्याचप्रमाणे एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ मिळेल. दुसऱ्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास एक मुलगा किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ मिळेल, मात्र आई किंवा वडिलांनी कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील. १ एप्रिल २०२३पूर्वी एक मुलगी किंवा मुलगा आणि आणि त्यानंतर दुसरी मुलगी किंवा जुळ्या मुली जन्माला आल्यास त्यांना या योजनेचा लाभ मिळेल. जुळ्या दोन्ही मुलांना स्वतंत्र लाभ देण्यात येईल. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे अशी ही योजना राज्यात राबविण्यात येणार आहे.

**मंत्रिमंडळ बैठकीत विविध निर्णय/२**

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सामंजस्याची भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

हिंदू सणांमध्ये एकमेकांतील वाद टाळावा म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सामंजस्याची भूमिका घेत दसरा मेळाव्याचा शिवाजी पार्क मैदानावरचा आपला दावा सोडला आहे.



**दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्कचा दावा सोडला**

शिवसेनेचा दसरा मेळावा प्रत्येक शिवसैनिकासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो, पण शिवसेनेतील अंतर्गत बंडाळीनंतर इतर अनेक मुद्द्यांप्रमाणेच दसरा मेळाव्यावरूनही वादावादी झाली. गेल्या वर्षी दसरा मेळाव्याचा वाद हायकोर्टापर्यंत गेला होता. यंदाही दोन्ही गटांनी शिवाजी पार्कसाठी अर्ज करीत दावा केला होता, पण मुख्यमंत्री शिंदे समर्थकांनी एक पाऊल मागे घेतले आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे यांचा यंदाचा मेळावा दक्षिण मुंबईतील क्रॉस मैदान किंवा ओव्हल ग्राउंडवर घेण्यात येणार असल्याची माहिती मंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

## पंतप्रधान मोदींचे सर्व घटकांसाठी योगदान –आमदार प्रशांत ठाकूर

### दिव्यांगांकडून भाजप पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सबका साथ, सबका विकास या सूत्राने देशातील सर्व घटकांसाठी योगदान देत आहेत. शारिरीक व्यंग असलेल्यांना पूर्वी आपल्या मराठीत अपंग असा शब्द होता. पंतप्रधान मोदींनी अपंगांना दिव्यांग असा चांगला शब्द दिला. यावरून त्यांची समाजासाठीची आपुलकी लक्षात येते, असे प्रतिपादन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. १०) केले. ते पनवेलमधील इच्छापूर्ती गणेश मंदिरात आयोजित सत्कार समारंभात बोलत होते.



भाजप पदाधिकाऱ्यांच्या नुकत्याच नियुक्त्या झाल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ पनवेल शहरातील दिव्यांगांच्या वतीने इच्छापूर्ती गणेश मंदिरात आयोजित करण्यात आला होता. भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत आणि सरचिटणीस अमरीश मोकल यांचा या वेळी करण्यात आला.

कोरोना महामारीच्या काळात आपले कर्तव्य चोखपणे बजावणाऱ्या आशा वर्कर शैला आंबेकर, ज्योती वाहुळकर, सुचिता पवार, सुवर्णा खैरे, दिपाली केदारे यांचाही सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**



# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णय

## सार्वजनिक खासगी भागीदारीतून उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी धोरण

**मुंबई : प्रतिनिधी**

सार्वजनिक खासगी भागीदारीतून उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी स्वतंत्र धोरण राबवून मोठ्या प्रमाणावर खासगी गुंतवणूकीला जलविद्युतमध्ये प्रोत्साहन देण्याचा निर्णय मंगळवारी (दि. १०) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.



राज्यात १० हजार ७५७ मेगावॅट अपारंपरिक ऊर्जा उत्पादन झाले आहे. २०२५पर्यंत ही ऊर्जा क्षमता २५ हजार मेगावॅटपर्यंत गाठण्याचे उद्दीष्ट आहे. सौर तसेच वाऱ्याच्या वेगाद्धारे निर्माण होणारी ऊर्जा पुरेशी नाही. त्यामुळे अशाश्वत नवीकरणीय ऊर्जा क्षमतेमध्ये तफावत येऊन एकूणच ग्रीडला आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे एनर्जी स्टोरेज सिस्टिमला महत्त्व आहे. यामध्ये अन्य पारंपरिक ऊर्जा प्रकल्पांना एनर्जी स्टोरेज सिस्टिममधून ऊर्जा देऊन ग्रीडचे संतुलन ठेवता येऊ शकते. वीजनिर्मितीत खंड पडल्यास अथवा तुडवडा पडल्यास या सिस्टिममधून ऊर्जा उपलब्ध होऊ शकते. केंद्रीय विद्युत मंत्रालयानेदेखील देशात उदचंन जलविद्युत प्रकल्पांना उत्तेजन देण्याचे ठरविले आहे.

या धोरणाद्धारे उदचंन जलविद्युत प्रकल्पातून (पीएसपी) मेगावॅट लेव्हल एनर्जी स्टोरेज क्षमता विकसित करणे सद्य:स्थितीतील पंप हायड्रो सोलर हायब्रील पॉवर प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, आंतरखोरे हस्तांतरणासाठी प्रोत्साहन देणे तसेच खासगी क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित करण्यात येईल. या संदर्भातील विकासकाची निवड सामजंस्य कराराद्धारे सरळ वाटप किंवा स्पर्धात्मक निविदा प्रक्रीयेतून करण्यात येईल.

उदचंन प्रकल्पाच्या माध्यमातून एनर्जी स्टोरेज सिस्टिमद्धारे क्षमता वाढविता येऊ शकते. शिवाय ते पर्यावरणस्नेही आणि स्वस्त आहे. सध्या घाटघर येथे उदचंन प्रकल्प २००८पासून कार्यान्वित आहे.

सांगली, अहमदनगर जिल्ह्यात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालये सुरू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सांगली जिल्ह्यातील विटा येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करून १९ नियमित पदे व पाच मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेद्धारे घेण्यास मान्यता देण्यात आली यासाठी एकूण एक कोटी ५० लाख ६८ हजार २५६ इतका खर्च येईल. अहमदनगर जिल्ह्यात राहाता येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय सुरू करण्यात येईल. १९ नियमित पदे व सहा मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेद्धारे घेण्यास मान्यता देण्यात आली यासाठी एकूण दोन कोटी १३ लाख ७६ हजार ४२४ इतका खर्च येईल.

फलटण ते पंढरपूर हा रेल्वेमार्ग तयार करण्यासाठी महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनीने (महारेल) १८४२ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचा अहवाल तयार केला होता. यामध्ये राज्य शासनाचा सहभाग ९२१ कोटी इतका असून हा निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येत आहे. हा प्रकल्प महारेलऐवजी रेल्वे विभागातर्फे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नाशिक येथील भोसला मिलिटरी स्कूलला नागपूर येथे जमीन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या ठिकाणी भारतीय प्रशासनीक पूर्व सेवा तयारी प्रशिक्षण वर्ग निवासी सुविधा व वरिष्ठ महाविद्यालयासह सुरु करण्यात येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नावात औरंगाबादऐवजी छत्रपती संभाजीनगर असा बदल करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, नवीन महाविद्यालये, अतिरिक्त तुकड्या सुरु करण्यासाठी आता पूर्वीच्या तारखेत बदल करण्यात येऊन १५ नोव्हेंबर २०२३ पूर्वी विद्यापीठाच्या कुलसचिवांकडे विहित नमुन्यात अर्ज करण्यास मान्यता देण्यात आली.

पात्र माजी खंडकरी शेतकऱ्यांना एक एकरापेक्षा कमी जमीनदेखील वाटप करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ अन्वये निश्चित केलेले किमान प्रमाणभूत क्षेत्राचे उल्लंघन न करता शेतकऱ्यास देय क्षेत्र वाटप करावे असे ठरले.

# महायुतीतील तीन पक्षांतर्फे लवकरच महासंवाद दौरा

## भाजप नेते ॲड. आशिष शेलार यांची बैठकीत माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

विधिमंडळातील विविध समित्यांचे अध्यक्ष, सदस्य तसेच महामंडळांवरील नियुक्त्या याबाबत मंगळवारी (दि. १०) झालेल्या महायुतीच्या तिन्ही पक्षांच्या समन्वय समितीमध्ये चर्चा झाली. याद्या तयार करण्यात आल्या असून तिन्ही पक्षांतर्फे राज्यात लवकरच महासंवाद दौरा करण्यात येणार असल्याची घोषणा मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांनी येथे केली.



महायुती समन्वय समितीची बैठक मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शासकीय निवासस्थानी झाली. या बैठकीला मंत्री छगन भुजबळ, खासदार सुनील तटकरे, मंत्री उदय सामंत, धनंजय मुंडे, खासदार राहुल शेवाळे, आमदार, प्रसाद लाड, आशिष कुलकर्णी, समीर भुजबळ आणि मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार आदी उपस्थित होते.

याबाबत माहिती देताना आमदार ॲड. आशिष शेलार म्हणाले की, स्वाभाविकता ही बैठक काही अंतरानंतर सातत्याने होणाऱ्या आमच्या बैठकीचा भाग असून समन्वयाचा भाग होती. आजचा प्रमुख विषय विधानसभेच्या अधिवेशनापूर्वी विधानसभा कामकाजातील लोकशाही प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग असलेल्या या विधानसभा आणि विधान परिषदेतल्या ज्या विविध समित्या आहेत, त्या समितीवर सदस्यांची नावे त्या पदांवर अध्यक्ष म्हणून तिन्ही पक्षाचे सन्माननीय नेते यांच्या नावां बाबत आज चर्चा झाली, त्यांचा अंतिम निर्णय हा विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा असतो. त्यांच्याकडे या सगळी नावे आज सुपूर्द केली जाईल आणि त्या समित्या तातडीने घोषित होतील.

तसेच येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे प्रमुख नेते राज्याचा प्रवास करणार असून पक्षाचे जे प्रमुख नेते आहेत, ते विभागीय दौरा करतील, जिल्ह्यातील दौरा अन्य नेते करतील आणि विधानसभा मतदारसंघापर्यंत सुद्धा तिन्ही पक्षांचे नेते जाणार आहेत, कोणता नेता कुठल्या विधानसभेत जाईल, कोण कुठल्या जिल्ह्यात जाईल, कोण कुठला विभागाचा नेतृत्व करेल, याबद्दलचा एक रिपोर्ट आम्ही आजच्या बैठकीत तयार केला आहे. त्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी हा रिपोर्ट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्याकडे पाठवण्यात येणार आहे. त्यानंतर आम्ही हा कार्यक्रम घोषित करू, असेही आमदार ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

दरम्यान, महामंडळ, समितीच्या वाटपाची संख्या, टक्केवारी याची चर्चा महत्त्वाची नसून तिन्ही पक्ष एकत्र येऊन राज्यात सर्व घटकांना न्याय मिळावा, सर्व पक्षातील सदस्यांना त्यामध्ये काम करण्याची संधी मिळावी, याचे स्वरूप डोळ्यासमोर घेऊन हा फार्मूला ठरला आणि त्याचा अंतिम स्वरूप तिन्ही नेते देतील, असेही आमदार ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

### विविध विषयांवर चर्चा

पूर्ण राज्यभर हा महासंवाद दौरा करण्यात येणार आहे. तसेच ज्या निवडणुका आता घोषित झाल्या आहेत, त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीतची सुद्धा प्राथमिक चर्चा पूर्ण झाली आहे, अंतिम निर्णय तीनही नेते करतील. या बैठकीमध्ये केवळ विधानसभा, विधान परिषदेच्या समित्याच नाही, तर महामंडळाबाबतीत तिन्ही पक्ष आणि आमच्या सहकारी पक्षांकडून येणारे सदस्य या सगळ्यांच्या सदस्य संख्येचा निर्णय, सोबत त्या महामंडळांवर अध्यक्ष म्हणून कुठल्या पक्षाचे नेते असतील, याबाबत सर्वसमावेशक अशी एक दिलाने चर्चा आम्ही आज झाली असून तोही प्रस्ताव अंतिमतः तिन्ही नेत्यांसमोर आम्ही पाठवला आहे, अशी माहिती आशिष शेलार यांनी दिली.

# कचऱ्याच्या ढिगांमुळे परिसराला बकालपणा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपाच्या वतीने विभागातील अनेक ठिकाणच्या कचराकुंड्या हटविण्यात आलेल्या आहेत, मात्र पालिकेकडून कोणत्याही प्रकारची नोटीस लावण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांकडून उद्यानाच्या बाजूला पदपथावर कुठेही कचरा टाकला जात आहे. सानपाडा विभागामध्ये कचऱ्याची समस्या खूप गंभीर बनत चालली आहे. यामुळे उद्यानांच्या बाहेरही कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत आहेत.

सानपाडा सेक्टर ७मधील नवी मुंबई महापालिकेचे संत शिरोमणी तुकाराम महाराज उद्यान तसेच विभागातील इतर सार्वजनिक उद्यानांच्या बाहेर कचऱ्याचे ढीग साचलेले असून शहरातील रस्ते आणि उद्यानांच्या बाहेर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत.

नवी मुंबई शहराला रंगरंगोटीचे काम केले असून दुसरीकडे उद्यानाच्या बाहेर गेटवरच मोठमोठे कचऱ्याचे ढीग साचलेले पहायला मिळतात. त्यामुळे या कचऱ्याच्या ढिगांमुळे उद्यानासह नवी मुंबई शहरालादेखील बकालपणा आला असल्याचे पहायला मिळत आहे, पालिकेच्या वतीने लवकरात लवकर सानपाडा विभागातील उद्याच्या बाहेरील कचऱ्याचे ढीग उचलावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# रिसच्या राजिप शाळेत व्याख्यान



**रसायनी, मोहोपाडा : प्रतिनिधी**

संवेदना डेव्हलपमेंट फाउंडेशन आणि डॉ. विदुला सोमण यांच्या संयुक्त विद्यमाने राजिप शाळा रिस येथे इ. पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी किशोरावस्था आणि व्यसनाधिनता या विषयावर व्याख्यान सोमवारी (दि. ९) आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिकांनी पाहुण्यांचे स्वागत करुन त्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर संवेदनाच्या मोहिनी बागडे यांनी मुलांना या विषयावर सोप्या भाषेत माहिती दिली. इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्रित करुन त्यांना गुड टच आणि बॅड टच म्हणजे काय? ते कसे ओळखायचे? या संदर्भात माहिती देण्यात आली. त्यानंतर मुलांना सामान्य ज्ञाना संदर्भात प्रश्न विचारुन बरोबर उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना छोटी बक्षिसे देण्यात आली.

# बोर्ले बौद्धवाडीतून एक जण बेपत्ता

**माणगाव : प्रतिनिधी**


माणगाव तालुक्यातील बोर्ले बौद्धवाडी येथून एक ३७ वर्षीय वक्ती बेपत्ता झाल्याने बोर्ले गावासह तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना शनिवारी फिर्यादी सखाराम धोंडू मोहिते (वय ६०, रा. बोर्ले) बौद्धवाडी यांच्या राहते घरातून घडली. याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे.

घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, बेपत्ता झालेल्या मुलाचे वर्णन रंगाने सावळा, अंगाने सडपातळ, उंची सुमारे पाच फूट, पायात काळी चप्पल, अंगात नेसूस काळी पॅन्ट व काळा शर्ट असा आहे. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनासाठी पोलीस हवालदार सानप हे करीत आहेत. दरम्यान, हा बेपत्ता झालेला मुलगा कोणाला आढळल्यास माणगाव पोलीस ठाणे (०२१४०-२६३००५) किंवा तापसिक पोलीस हवालदार सानप (९६३७२८६३७८) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ऑक्टोबर हिट भातपिकासाठी ठरतेय पोषक

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्याने जमिनीत पाण्याची उफळ झालेली नाही. त्यामुळे पाऊस थांबला की तापमान वाढते. असा अनुभव मुरूडवासीय घेताना दिसून येतात. तरीही ऑक्टोबर हिट भात पिकासाठी गरजेची आणि पोषक आहे, असे मत येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे.



मुरूड तालुक्यात आताऑक्टोबर हिटच्या झळा लागण्यास सुरुवात झाली आहे. सोमवारी दुपारी तालुक्यातील तापमान ३४ डिग्री सेल्सियस वर पोचल्याने नागरिक घामाघूम झालेले दिसत होते. पर्यटनाचा सिझन सुरू झाला असला तरी रविवारी २० टक्केच पर्यटक मुरूड मध्ये दिसून येत होते. आगामी आठवड्यात पर्यटकांची मोठी वर्दळ वाढण्याचे संकेत पर्यटन व्यवसायिकांनी दिले आहेत. प्रसिध्द काशीद बीच पासून नांदगाव, मुरूड बिचवरील सर्व स्टॉल्स, हॉटेलिंग, लॉजिंग, घरगुती निवास, खानावळी पूर्ण क्षमतेने सुरू झाल्या आहेत. जंजिरा जलदुर्गदेखील पर्यटकांसाठी खुला करण्यात आल्याने पर्यटक पर्यटकांतून आणि पर्यटन व व्यवसायिकांतून समाधानाचे वातावरण आहे.

मुरूड तालुक्यात जून ते सप्टेंबर एकूण सरासरी पाऊस हा २५६० मिलीमीटर एवढा बरसला आहे. १ ऑगस्ट हा संपूर्ण महिन्यात पाऊस पडला नसताना सुद्धा पावसाने सप्टेंबर महिन्यात जोरदार अतिवृष्टी करून मुबलक प्रमाणात पाऊस पडल्याने पावसाने दरवर्षीचा सरासरी आकडा गाठला आहे. मुरूड तालुक्यात दरवर्षी २८०० मिलीमीटर एवढा पाऊस पडत असतो, परंतु यंदा थोडा पाऊस कमी होऊन सुद्धा भात पिकाला पोषक असा पाऊस पडल्याने भात पिकाचे यंदा विक्रमी उत्पादन होणार आहे. मुरूड तालुक्यात एकमेव पावसावर शेती केली जाते. ३९०० हेक्टर क्षेत्रात भाताची लागवड केली जाते. तालुक्यातील शेतकरी विविध जातीच्या भाताची लागवड करीत असतात.

### शेतकरी सुखावले

*सध्या रोपे पिवळी होऊन भात पिक तयार होण्यास सुरुवात झाली आहे. भाताचा दाणा तयार झाल्याने स्थानिक शेतकरी सुखावले आहेत. मुरुड तालुक्यात सुवर्ण हे भात पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. त्याच बरोबर जया, रुपाली, जोरदार, शुभांगी, चिंटू, वाडा कोलम व भाताच्या इतर जातीचे पीकसुद्धा घेतले जाते. यंदा भाताच्या भावास ४३ रुपयांची वाढ मिळणार असल्याचे शासनाने जाहीर केल्याने शेतकरी सुखावले आहेत.*

**मुरूड तालुक्यात शेवटच्या टप्प्यात चांगला पाऊस झाल्याने भात पिकाला बळकटी मिळाली आहे. पोषक असा पाऊस पडल्याने भात पिकाच्या लोम्ब्या तयार होऊन भाताचे दाणे तयार झाले आहे.यंदा भाताचे विक्रमी पीक होणार आहे, परंतु सध्या ओक्टोम्बर हिट सुरु असून तापमानात वाढ झाली आहे. तापमान प्रमाणापेक्षा वाढ होऊ नये अन्यथा भात पिके करपली जातील व उत्पदनात घट सुद्धा होऊ शकते.**

**-श्रीधर जंजीरकर, उपाध्यक्ष, किसान क्रांती संघटना**

# तृतीयपंथीयांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा -मंत्री दीपक केसरकर

**मुंबई : प्रतिनिधी**

समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. तृतीयपंथीयांसाठी शासन विविध योजना राबविते. या समुदायातील व्यक्तींनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे अवाहन शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांनी केले.




सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत तृतीयपंथी व्यक्तींच्या कल्याणकारी योजनांबाबत राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मंत्री केसरकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यशाळेस सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, 'बार्टी'चे महासंचालक सुनिल वारे, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये, किन्नरमां ट्रस्टच्या सलमा खान, युएनडीपी चे डॉ. चिरंजिवी भट्टाचार्य, तृतीयपंथीयांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मंत्री केसरकर म्हणाले की, मानसिक बदल आणि संवादाच्या माध्यमातून तृतीयपंथीयांना समजून घेऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करुया. तृतीयपंथीयांसाठी रोजगार निर्मिती करून सक्षमीकरणावर शासन भर देत आहे. या समुदायासाठी वसतिगृह उभारण्याचा विचार सुरू असून इतर राज्यातील धोरणांचा अभ्यास करून या समुदायांसाठी राज्याचे सर्वंकष धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. या समुदायांचे जीवनमान उंचावेल यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील राहील. तृतीयपंथीयांच्या समस्या, प्रश्न व मागण्यांबाबत लवकरच मुख्यमंत्री महोदयांकडे बैठक घेण्यात येईल.

या कार्यशाळेचे चार सत्रात आयोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रात तृतीयपंथीय व्यक्तींच्या सामाजिक समस्या, नोंदणी प्रमाणपत्र व ओळखपत्र याबाबत डॉ. वैशाली कोल्हे, सलमा खान, पवन यादव यांनी माहिती दिली. दुसऱ्या सत्रात सामाजिक व आर्थिक उन्नतीच्या योजना आणि शिक्षण व रोजगार याबाबत श्रीदेवी रासक यांनी माहिती दिली. तिसऱ्या सत्रात तृतीयपंथीय व्यक्तींचे आरोग्य, पुनर्वसन आणि कल्याणकारी योजना याबाबत डॉ. चिरंजिवी भट्टाचार्य यांनी माहिती दिली. चौथ्या सत्रात तृतीयपंथीय व्यक्तींचे मानसिक आरोग्य, तृतीयपंथीय व्यक्तींचे सामाजिक प्रश्न, त्यांचे मानवी हक्क अबाधित राखण्यासाठी सार्वजनिक धोरणाद्वारे निवारण याबाबत प्रा. श्याम मानव, निर्मला सामंत प्रभावळकरांनी माहिती दिली.

प्रास्ताविक सामाजिक न्याय विभागाचे सचिव भांगे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अवर सचिव रवींद्र गोरवे यांनी मानले. कार्यक्रमास समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त, मुंबई वंदना कोचुरे, मुंबई शहर सहाय्यक आयुक्त प्रसाद खैरनार, रायगड सहाय्यक आयुक्त सुनील जाधव, ठाणे सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे उपस्थित होते.

## पान १ वरुन

### पंतप्रधान मोदींचे सर्व घटकांसाठी योगदान -आमदार प्रशांत ठाकूर

मी लोकसभा निवडणूक प्रमुख झालो, त्याला आता तीन-चार महिने झाले आहेत. माझा पहिला सत्कार तुम्ही केला. त्याबद्दल तुमचे मनापासून आभार असे सांगून आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, तुम्ही आम्हाला आमचे मानता याबद्दल समाधान वाटले. आपण सारेजण एका परिवाराचे घटक आहोत.

या कार्यक्रमास भाजप ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे, अशोक आंबेकर, दिव्यांग सेल अध्यक्ष शिवाजी कांबळे, संजय जाधव, संभाजी वाघमारे, राहुल खरात, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अशोक कांबळे, उपाध्यक्ष बी. व्ही. पाटील, पप्पू साळवे, नंदा टापरे, जरिना शेख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि दिव्यांग बांधव, भगिनी उपस्थित होते.

# मंगळागौर, पारंपरिक फेर नृत्य स्पर्धा

**उरण** : केअर ऑफ नेचर सामाजिक संस्था वेश्वीतर्फे गुरुवारी (दि. १२) सायंकाळी ४.३० वाजता श्री साई देवस्थान, साई नगर, वहाळ, पनवेल येथे महिलांसाठी मंगळागौर व पारंपरिक फेर नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांकास ७००० रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकास ५००० व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांकांस ३००० रुपये व सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी अमृत म्हात्रे (९९३०९३२३५०) यांच्याशी संपर्क साधून नावनोंदणी करावी, असे आवाहन केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक सदस्य राजू मुंबईकर यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा

## शिक्षक संघाच्या भाजप पाठीशी; आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही



**खारघर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाच्या वतीने पाचव्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात राज्यभरातील १११ शिक्षकांना सन्मानित करण्यात आले. या वेळी आम्ही शिक्षक संघाच्या पाठीशी असल्याची ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली. पनवेलमधील फडके नाट्यगृहात आमदार प्रशांत ठाकूर आणि जयकुमार गोरे यांच्या प्रमूख उपस्थितीत हा सोहळा राज्यभरातुन उपस्थित असलेल्या शिक्षकांच्या उपस्थितीत रविवारी (दि.८) झाला.

कार्यक्रमाची सुरुवातीला शिवशाहीर वैभव घरत यांच्या कार्यक्रमाने झाली. या वेळी नगरपालिका व मनपा शिक्षक संघाचे राज्य अध्यक्ष अर्जुन कोळी, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार राजकुमार गोरे, आयआयएफएल गोल्ड लोन फायनान्स कंपनी उद्योजक उमेश भरडा, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, मनोहर म्हात्रे, राज्य उपाध्यक्षा ज्योत्स्ना भरडा, मुंबई विभागीय अध्यक्ष वैभव पाटील, रायगड जिल्हा अध्यक्ष प्रमोद लांगी, दशरथ म्हात्रे, सुभाष कोल्हे, सरचिटणिस अरुण पवार, सरचिटणीस किशोर पाडवी, महिला आघाडी प्रमुख साधना साळुंखे, कोषाध्यक्ष आनंदराव कोळी आदी शिक्षक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मान्यवरांकडून कौतुक

*या वेळी आमदार जयकुमार गोरे यांनी बोलताना पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच नगरपालिका व महापालिका शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली. आमदार प्रशांत ठाकूर यांनीदेखील शिक्षकांच्या प्रश्नाबाबत आम्ही शिक्षक संघाच्या पाठीशी असल्याची ग्वाही या कार्यक्रमात दिली. शिक्षक संघाचे अध्यक्ष अर्जून कोळी यांनीदेखील संघटनेच्या* कामाची माहिती उपस्थितांना दिली.

## पनवेल परिसरात दोन अपघातांमध्ये एक ठार, एक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात दोन अपघातामध्ये एक ठार एक जखमी झाल्याची घटना घडली आहे. पनवेल शहराजवळून जाणाऱ्या जेएनपीटी रोड वरून ट्रेलर चालक शाहरुख दगडू शेख वय (वय २५) हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर घेऊन जात असताना त्याचा ट्रेलर वरील ताबा सुटल्याने त्याचा ट्रेलर उजव्या बाजूच्या पलीकडच्या रस्त्यावर आला. त्यामुळे त्याने तो ट्रेलर पुन्हा मूळ रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न केला असता त्याचा गाडीवरील ताबा सुटून त्याने रस्ताच्या दुभाजकाच्या माईलस्टोनला धडक देऊन त्याचा ट्रेलर पलटी होऊन त्या खाली तो सापडल्याने त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मुंबई लेनवरून जाणाऱ्या पिकअप टेम्पोला पाठीमागून येणाऱ्या आयशर ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात पिकअप टेम्पो उलटा होऊन चालक मेहताब अली हा जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कार चोरणारा गजाआड



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुकयातील हरिग्राम रोहाऊस समोर उभी करून ठेवलेल्या हुंडाई इऑन एरा गाडीची चोरी केल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी अवघ्या २४ तासात एका आरोपीला गजाआड केले आहे व त्याच्या कडून चोरीची गाडी हस्तगत केली आहे .

विद्या गुजर यांनी त्यांची एक लाख रुपये किमतीची सफेद रंगाची हुंडाई इऑन एरा गाडी (एमएच १२ एनपी ९१०४) तालुक्यातील हरिग्राम-माथेरान रोड येथील रोहाऊससमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ही गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

या तक्रारीनुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील, पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे विभागाचे सहाय्यक पोलीस संजय गळवे, हवालदार विजय देवरे, महेश धुमाळ, सुनील कुदळे, शिपाई आकाश भगत आदींच्या पथकाने गुप्तबातमीदार, तांत्रिक तपास व सीसीटीव्ही फुटेज आधारे शोध घेतला. या वेळी आरोपी मयुर प्रदास मोरे (वय २८, रा. सुकापूर) हा चोरीच्या गाडीसह पनवेल परिसरात असल्याचे आढळून आल्याने आरोपीस सापळा रचून गाडीसह ताब्यात घेण्यात आले. त्याच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील इतर गाडी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

## मराठी फेरीवाल्यांना मिळाला परवाना

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल एस.टी स्थानकात २० वर्षांहून अधिक काळ शेंगदाणे-चिक्कीपासून अनेक खाद्य पदार्थांची विक्री करणाऱ्या स्थानिक मराठी फेरीवाल्यांना अखेर न्याय मिळाला आहे. अधिकृत परवाना नसल्याने जुने परवाने किंवा इतरांच्या नावाने व्यवसाय करणाऱ्या या लोकांना एसटीचे अधिकारी वारंवार आडकाठी करत.

अधिकृत परवान्याच्या विषयावरून नवनवीन येणारे पनवेल आगारातील अधिकारी आणि हे सर्व फेरीवाले यांच्यात नेहमी खटके उडत. यावर कायमस्वरूपी तोडगा निघावा यासाठी चिक्की विक्रेता संघटनेचे अध्यक्ष व शिवसैनिक खंडेश धनावडे यांनी पनवेलचे शिवसेना महानगरप्रमुख, माजी नगरसेवक ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्याकडे मागणी केली असता मुख्यमंत्री मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे थेट हा विषय मांडला. मुख्यमंत्री शिंदे यांनी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना योग्य ते आदेश दिल्यानंतर प्रथमेश सोमण यांनी वारंवार पाठपुरावा केला व अखेरीस वर्षानुवर्षे वाट पहाऱ्यांना या १९ स्थानिक मराठी फेरीवाल्यांना आता व्यवसायाचे अधिकृत लायसन्स मिळाले आहे.

एसटी स्थानकातील अनेक चोऱ्या पकडून देण्यापासून एसटीची गणेशोत्सवाची जबाबदारी उचलण्यापर्यंत अनेक बाबींमध्ये एसटी प्रशासनाला या फेरीवाल्यांचे मोठे सहकार्य असायचे. मध्यंतरी एसटी स्थानकातील चोरी पकडून दिल्याबद्दल स्थानिक पोलिसांनी सत्कार केला होता.

## निवडक

### आपटा फाटा साई मंदिरात चोरी

**पनवेल :** तालुक्यातील आपटा फाटा परिसरातील साई मंदिरात रात्री चोरी घटना घडली असून अज्ञात चोरट्यांनी मंदिरातून सोने-चांदीचे दागिने व इतर वस्तू चोरून नेल्या आहेत. या परिसरात पाच ते सहा मंदिरे आहेत. उदय तिवारी व त्यांच्या परिवारातील सदस्य या मंदिरांमध्ये पूजा करतात. साई मंदिर पूजा करून बंद केल्यानंतर, रात्री चोरट्यांनी खिडकीतून मंदिरात प्रवेश करून चोरी केली. मंदिरातील भगवती देवीच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र, चांदीचे पाच दिवे, चांदीचा मुकुट, देवीची चांदीची छत्री, चांदीची घंटी, त्रिशूल, प्रभावळ, लक्ष्मीचा शिक्का व इतर वस्तू चोरी करून नेल्या आहेत. या प्रकरणी नवीन पनवेल पोलिस स्टेशनमध्ये चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

### पनवेलच्या ठोंबरेवाडीत घडफोडी

**पनवेल :** तालुक्यातील ठोंबरेवाडीत एका राहत्या घरामध्ये एका अज्ञात चोरट्याने घडफोडी करून रोख रकमेसह कागदपत्रे लंपास केल्याची घटना घडली आहे. या वेळी अज्ञात चोरट्यांनी घराच्या पाठीमागील खिडकीची लोखंडी ग्रील कापून प्रवेश केला. या वेळी एका पाकीटामध्ये दोन ते तीन हजार रुपये दोन एटीएम कार्ड कंपनीचे ओळखपत्र चार चाकीचा परवाना गाडीचे आरसी बुक घेऊन चोरटे पसार झाले आहेत. या चोरीची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.









**पनवेल : भाजपचे संतोष म्हात्रे आणि डॉ. संतोष आगलावे यांना वाढदिवसानिमित्त निमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, विकास घरत, दिलीप पाटील, भाजपचे प्रदीप भगत, प्रकाश पाटील, संतोष भगत, किशोर गोवारी, महेंद्र गोवारी, काशिनाथ पाटील, गणेश भगत, मंगेश भेंडे आदी उपस्थित होते. दरम्यान, संतोष म्हात्रे यांना माजी सभागृह नेते परेश ठाकूर तसेच भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनीही वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**





**पनवेल : भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे नातू सार्थक हरेश पाटील आणि नात संस्कृती हरेश पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून मंगळवारी मोठ्या उत्सहात साजरा झाला. वाढदिवसानिमित्त भानघर येथील करुणेश्वर वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांना फळांचे वाटप भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. केक कापून सार्थक आणि संस्कृतीचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या वेळी हरेश पाटील, विश्वजीत पाटील, अनिल कोकाटे, रहीम लदाप यांच्यासह ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

## रामेश्वर देवस्थानकडून नितीन पाटील यांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक आणि जाणीव या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नितीन पाटील कोणत्याही मोबदल्याची किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता श्री रामेश्वर महादेव देवस्थानाला जमेल त्या मार्गाने दान अथवा मदत करत असतात. त्याबद्दल नितिन पाटील यांचा श्री रामेश्वर देवस्थानकडून सन्मान करण्यात आला.

श्री रामेश्वर देवस्थान आणि जाणीव सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षांपासून त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी मंदिर परिसरात दीपोत्सव साजरा होतोय. दिवाळी २०२२ मधे जाणीव सामाजिक संस्थेच्या किल्ले स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आपल्या मंदिरात घेतला होता. जाणीव सामाजिक संस्थेचे सर्व सभासद ही देवस्थानच्या कार्यक्रमांना सहभागी होऊन मदत करीत असतात.

भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्या सेवेचा सन्मान म्हणून श्री रामेश्वर महादेव देवस्थान, पनवेल यांच्यातर्फे शिवलिंगाची प्रतिकृती भेट म्हणून देण्यात आली.



## नांदगावमध्ये मोफत कॅन्सर तपासणी शिबिर

### १०१ जणांनी घेतला लाभ






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप जैन प्रकोष्ठ, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने कॅन्सर मुक्त महाराष्ट्र अभियानांतर्गत मोफत कॅन्सर तपासणी पनवेल तालुक्यातील नांदगाव येथे मंगळवारी (दि. १०) राबविण्यात आली. १०१ जणांनी या शिबिराचा लाभ घेतला.

यामध्ये मोफत कॅन्सर तपासणी अंतर्गत ब्रेस्ट कॅन्सर, सर्व्हायकल कॅन्सर, लंग कॅन्सर, ओरल कॅन्सर, अश्या विविध प्रकारच्या तपासण्या करण्यात आला. कर्करोग ही भारतासह जगासमोरची एक प्रमुख समस्या आहे. दरवर्षी लाखो लोकांना कर्करोगानं आपला जीव गमवावा लागतो. बदलती जीवनशैली, भेसळयुक्त आहार, व्यसनं आदी कारणांमुळे कर्करोगाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचं दिसून येते. कर्करोगाच्या दोन-तृतीयांश प्रकरणांचे निदान शेवटच्या टप्प्यावर होते, ज्यामुळे रुग्णांची जगण्याची शक्यता कमी होते, योग्य वेळी निदान झाल्यास प्राथमिक अवस्थेतील कर्करोगाचा उपचार होऊ शकतो. नंतरचे उपचार अधिक खर्चिक आणि तुलनेनं कमी प्रभावी ठरतात. त्यामुळे सुरुवातीच्या स्तरांवर उपचार मिळाल्यास रुग्णाचा जीव वाचू शकतो. यासाठी भाजपच्या वतीने शिबिर राबविण्यात आले.

या कार्यक्रमाला माजी नगरसेविका दर्शना भोईर, सरपंच विजेता भोईर, उपसरपंच अर्चना पाटील, मनोहर भोईर, अविनाश गायकर, अविनाश हुद्दार, अनिल शितकंदे, राजेश हुद्दार, आदित्य गायकर, भावेश फडके, रोहिदास गायकर, मिथुन शितकंदे, दिनेश खुटले, कुणाल फडके, राहुल गायकवाड, अशोक कोंडीलकर, सखाराम ठाकूर, विनायक पाटील, दिलीप खुटले, विजय भोईर, नारायण भगत, नामदेव भोईर, प्रेम शितकंदे, प्रेम लता राघव, अर्शद, असीफ, सुखवीर सिंग आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# रिंगणाबाहेरील कुस्ती

शिवसेना नावाचा मूळ पक्ष, पक्षाचे धनुष्यबाण हे चिन्ह आणि आमदार-खासदारांसह बहुतेक सर्व लहान मोठे नेते आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठिशी भक्कमपणे उभे आहेत. जवळपास तीन दशकांचा जोडीदार असलेला भारतीय जनता पक्षासारखा मित्रपक्ष सर्व सामर्थ्यानिशी शिंदे यांच्या मागे उभा आहे. ठाकरे गटाकडे ना नेते, ना कार्यकर्त्यांची फौज. तरीही दसरा मेळावा शिवतीर्थवरच घेण्याचा त्यांचा हट्ट मात्र कायम आहे.

**शिलंगणाचे सोने लुटायला आता थोडेच दिवस उरले आहेत. दरवर्षी नवरात्र झाल्यानंतर दसरा उजाडतो, त्या दिवशी सीमोल्लंघन करण्याची परंपरा आहे. महाराष्ट्रातील आणखी एक परंपरा म्हणजे शिवसेनेचा दरसाल होणारा दसरा मेळावा. महाराष्ट्रातील गावागावात राहणारे लहान थोर शिवसैनिक या दिवशी दादरच्या शिवाजी पार्क मैदानात एकवटत असत. हिंदूहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे सोने लुटण्यासाठी लाखो शिवसैनिक शिवाजी पार्कच्या मैदानावर जमत असत. त्यांच्यासाठी ते शिवाजी पार्क नसून शिवतीर्थ असे. आजही शिवसैनिकांसाठी ते शिवतीर्थच आहे. शिवसैनिकच नव्हे, तर स्वर्गीय बाळासाहेबांचे चाहते असलेल्या विरोधी पक्षातील इतर नेत्यांसाठीही शिवाजी पार्क या मैदानाबद्दल विशेष अनुबंध आहे. तथापि, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा स्वर्गवास झाल्यानंतर दसरा मेळाव्याची ती जादू हळूहळू ओसरत गेली. सुमारे सव्वा वर्षापूर्वी शिवसेनेची शकले झाली. त्यानंतर दसरा मेळावा हे कुरबुरीचे निमित्त ठरू लागले. शिवसेनेतील सारे कडवट सैनिक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत वेगळे झाले आणि खुर्चीला चिकटून बसण्याच्या नादात उरल्यासुरल्या ठाकरे गटाकडे मोजके काही शिवसैनिक उरले. तथापि, शिवसेनाप्रमुखांचा वारसा सांगणाऱ्या ठाकरे गटाला गेली दोन्ही वर्षे शिवाजी पार्कचे मैदान भांडून-तंटूनच मिळवावे लागत आहे. एका मैदानासाठी त्यांना आपली सारी प्रतिष्ठा पणाला लावावी लागते यातच सारे आले. याउलट मुख्यमंत्री शिंदे यांनी सर्वच बाबतीत उदार धोरण स्वीकारले आहे. स्वर्गीय बाळासाहेबांच्या प्रतिष्ठेला बाधा येईल असे कोणतेही कृत्य त्यांच्या हातून घडलेले नाही. यंदादेखील दसरा मेळावा शिवाजी पार्क मैदानावर घेण्याऐवजी दक्षिण मुंबईतील ओव्हल किंवा क्रॉस मैदानावर घेण्याचा त्यांचा विचार सुरू आहे. शिवाजी पार्क मैदानाच्या वापरासाठी ठाकरे गट आणि शिंदे यांच्या पाठीराख्यांनी मुंबई महापालिकेकडे रीतसर अर्ज केले आहेत. त्याचा निकाल येत्या तीन-चार दिवसांत लागेल असे सांगण्यात येते, परंतु या क्षुल्लक भांडणात न पडता अन्यत्र मोठे मैदान शोधण्याची मुख्यमंत्री शिंदे यांची कल्पना स्तुत्य म्हटली पाहिजे. शिवसेनेच्या दसरा मेळाव्याबाबत बहुतांश मराठी मनांमध्ये एक हळवा कोपरा असतो. त्याला नख न लावण्याचे हे धोरण शिंदे यांनी स्वीकारले आहे. तथापि, हीच परिपक्वता ठाकरे गटाला दाखवता आली नाही हे खरेच. दसरा मेळाव्याच्या मुद्द्यावरून ठाकरे गटाचे प्रवक्ते वारेमाप बोलत सुटले आहेत. शिंदे गटाने दसरा मेळाव्याला पंतप्रधान मोदी यांनादेखील बोलवावे अशी बाष्कळ बडबड ठाकरे गटाकडून सुरू आहे. शहाणा शिवसैनिक त्याकडे निश्चितच लक्ष देणार नाही. याउलट सत्ताधारी शिवसेनेचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी मात्र परिपक्व शब्दांत भूमिका मांडली. मैदानावरून होणारे हे भांडण कुठल्याही सच्च्या शिवसैनिकाला आवडणारे नाही. खरे सांगायचे तर दसरा मेळावा कुठल्या मैदानावर होतो याला तसे काही महत्त्व नाही. महत्त्वाचे असते ते विचारांचे सोने!**

# मंत्रालय सुरक्षा होणार अधिक सुसज्ज अन् अद्ययावत!



भाग २

मंत्रालय हे राज्यातील प्रशासकीय मुख्यालय आहे. या आस्थापनेमध्ये मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री यांची कार्यालये तसेच सर्व महत्त्वाची प्रशासकीय विभागांची कार्यालये आहेत. त्यामुळे मंत्रालय ही अत्यंत संवेदनशील व महत्त्वाची आस्थापना असल्याने या आस्थापनेची सुरक्षादेखील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्या अनुषंगाने शासन निर्णयान्वये मंत्रालयात अभ्यागतांना व वाहनांना प्रवेश देण्याबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आल्या होत्या. तथापि, तद्नंतरच्या कालावधीत मंत्रालयात घडलेल्या आपत्कालीन घटना विचारात घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने मंत्रालय परिसराचा घेण्यात आलेला आढावा, अभ्यागतांची वाढती संख्या व मंत्रालयात उपलब्ध असलेली वाहनतळांची मर्यादित जागा, इत्यादी बाबी विचारात घेतल्यानंतर मंत्रालय सुरक्षेच्या अनुषंगाने शासनाकडून सुधारित मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आल्या आहेत. याबाबत लेखातून अधिक माहिती जाणून घेऊया...

मंत्रालयात प्रवेशपत्रिका देण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री यांच्या कार्यालयातील एका विशेष कार्य अधिकाऱ्याचे नाव नामनिर्देशित करून पोलीस उपायुक्त मंत्रालय सुरक्षा यांना कळविण्यात यावे. त्यामुळे भविष्यात नामनिर्देशित अधिकाऱ्यांनी एखाद्या अभ्यागताची शिफारस मंत्रालय सुरक्षा कक्षास केल्यानंतरच संबंधित अभ्यागतास प्रवेश देण्यात येईल. ही जबाबदारी मंत्रालय सुरक्षा कक्षाची राहील तसेच संबंधित प्रशासकीय विभागांच्या सचिव यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही अभ्यागतास मंत्रालयामध्ये संबंधित प्रशासकीय विभागात प्रवेश करण्यासाठी प्रवेश पत्रिका देण्यात येऊ नये. यापुढे मंत्रालयामध्ये वाहन अथवा अभ्यागत यांच्या प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारे तोंडी सूचना अथवा फोनद्वारे देण्यात येणाऱ्या सूचना स्वीकारण्यात येणार नाहीत.

उपहारगृहाची वेळ/रात्री थाबंणारे कर्मचारी यांची माहिती कळविणेबाबत-मंत्रालयातील उपहारगृहाची वेळ सायंकाळी ७ वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. पुन्हा मंत्रालयामध्ये उशिराने प्रवेश करणाऱ्या कर्मचाऱ्यांची तसेच रात्री उशिरापर्यंत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती पोलीस नियंत्रण कक्षास कळवण्यासाठी NICने विशिष्ट फॉरमॅट तयार करावा व या फॉरमॅटमधील माहिती मंत्रालयातील पोलीस नियंत्रण कक्षास विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने कळविण्यात यावी. सायंकाळी कार्यालयीन वेळेनंतर कोणत्याही मंत्रालयीन कर्मचाऱ्यास मंत्रालयात प्रवेश द्यावयाचा असल्यास संबंधित विभागाच्या सचिवांची मान्यता आवश्यक राहील तसेच त्याबाबत मंत्रालय सुरक्षा कक्षाला सूचना देणे आवश्यक राहील.

मंत्रालयाच्या परिसरात बाहेरून कोणत्याही स्वरुपाचे खाद्यपदार्थ (कर्मचाऱ्यांच्या जेवणाचे डबे वगळून) आणण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

अलर्ट करणारी संदेश यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत-मंत्रालय अंतर्गत व बाह्य परिसराची सीसीटीव्हीमार्फत सतत निगराणी ठेवण्यात येईल तसेच परिसीमेवर लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा समोरून किंवा संरक्षक जाळी ओलांडून प्रवेशाचा प्रयत्न होत असल्यास त्याबाबत अलर्ट संदेश देणारी कार्यप्रणाली पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांच्याकडून कार्यान्वित करण्यात येणार आहे.

मंत्रालयातील सर्व गेट्सवर RFID टॅग एनपीआर कॅमेरा आणि बूम बॅरियर बसविणेबाबत-मंत्रालयात वाहन प्रवेश करताना RFID टॅग एनपीआर कॅमेरा आणि बूम बेरियर ओपन होण्यासाठी संगणकीय प्रणालीमध्ये बदल करून अद्यावत करणे व ही यंत्रणा मंत्रालयातील सर्व गेट्सवर बसवून कार्यान्वित करण्याबाबतची कार्यवाही पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांच्याकडून करण्यात येणार आहे.

मंत्रालयात कोणत्याही विभागात खासगी कामगारांमार्फत दुरुस्तीचे सुधारण्याचे नव्याने काम चालत असल्यास संबंधित विभागाचा शासकीय जबाबदार कर्मचारी उपस्थित राहण्याचे बंधनकारक करण्यात येत आहे.

नव्याने निर्माण होणाऱ्या मेट्रो सबवेमधून शासकीय अधिकारी-कर्मचारी, अभ्यागत मंत्रालयात प्रवेश करणार असल्याने या ठिकाणी अद्ययावत सुरक्षा तपासणी कक्ष पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांनी स्थापन करावयाचा आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर विभागांमार्फत मंत्रालयात खासगी कर्मचाऱ्यांना प्रवेश द्यावयाचा असल्यास आधार कार्डद्वारे आणि सीसीटीएनएस प्रणालीद्वारे पोलीस उपयुक्त, मंत्रालय सुरक्षा यांनी तपासणी करून परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. याकरिता सीसीटीएनएस यंत्रणा मंत्रालय सुरक्षा कक्षामध्ये तातडीने चालू करण्यात येईल.

मंत्रालय मुख्य इमारत व विस्तार इमारतीच्या टेरेसवर जाणारे सर्व मार्ग बंद करण्यात येत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिकृत प्रवेश असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नोंदी ठेवाव्यात व केवळ अधिकृत व्यक्तीच टेरेसवर प्रवेश करतील, याची खबरदारी घ्यावी.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, मंत्रालयाच्या मोकळ्या कॉरिडॉरमध्ये खिडक्यांमधून किंवा प्रत्येक मजल्यावरील मोकळ्या जागांमधून उडी मारण्याचा प्रयत्न अभ्यागतामार्फत होऊ शकतो. अशा ठिकाणी Invisible Steel Ropes लावण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणार आहे.

मंत्रालय परिसरात फिरणारे भटके कुत्रे, मांजर व इतर पाळीव प्राणी/पक्षी यांना प्रतिबंध करण्यासाठी मुंबई महापालिकेने आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कराव्यात. मंत्रालयाच्या मागील बाजूने गार्डन गेटच्या बाजूने आरसा गेट परिसरात पेरिमीटरवर असलेल्या ग्रीलला एक मीटर उंचीची जाळी बसविण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणार आहे. मंत्रालयात पाळीव प्राण्यांना खाद्यपदार्थ देण्यास मनाई करण्यात आली आहे.

प्रशासकीय कामाचा त्वरित निपटारा करण्याच्या अनुषंगाने शासनाने मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ क्षेत्रीय कार्यालय तसेच अभ्यागतांकडून येणारे टपाल स्वीकारण्यासाठी मध्यवर्ती टपाल केंद्र यापूर्वीच सुरू केलेले आहे. यापुढे मंत्रालयामध्ये टपाल घेऊन येणाऱ्या अभ्यागतास प्रतिबंध करण्यात येत आहे. मंत्रालयामधील संपूर्ण टपाल हे मध्यवर्ती टपाल केंद्रामध्येच स्वीकारले जाईल याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी.

मंत्रालयाच्या जवळ (१) गार्डन गेट समोरील बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पार्किंग ताब्यात घेणे (२) सचिवालय जिमखाना येथील पार्किंग (३) Inox इमारत येथील पार्किंग (४) Inox इमारतीच्या मागील बाजूस असलेले विधानभवनाजवळील पार्किंग या सर्व पार्किंगची चाचपणी करुन या पार्किंगची जागा मंत्रालय पार्किंगसाठी ताब्यात घेण्याची आवश्यक कार्यवाही सहपोलीस आयुक्त, वाहतूक, मुंबई शहर यांनी करावयाची आहे.

मंत्रालयामध्ये प्रवेश करण्याऱ्या अभ्यागतांनी सोबत रु.१० हजारपेक्षा अधिक रक्कम घेऊन प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे. अधिकची रक्कम सुस्थितीत ठेवण्यासाठी अभ्यागतांना व्हिजीटर प्लाझा येथे Lockशी उपलब्ध करुन देण्यात येईल. सद्य:स्थितीत उपलब्ध असणाऱ्या Lockerचा उपयोग करण्यात यावा.

मंत्रालय प्रवेशपास देण्याकरिता वरिष्ठ कार्यालयांमार्फत प्रवेश देण्याच्या सूचना देण्यासाठी Requisition Form हा NICद्वारे intranet प्रणालीवर विकसित करण्यात येणार असून या प्रणालीद्वारेच वरिष्ठ कार्यालयांनी उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांना मंत्रालय प्रवेशाबाबत नमूद कार्यपध्दतीनुसार विनंती करावी.

मंत्रालयातील मध्यवर्ती नियंत्रण कक्षामध्ये आवश्यक त्या सर्व CCTVचे feed देण्यात यावे. नियंत्रण कक्ष हा सर्व प्रकारच्या तांत्रिक बाबींसाठी सुसज्ज अशी यंत्रणा असेल याची खबरदारी पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांनी घ्यावी. मंत्रालय परिसरामध्ये जागा उपलब्ध करुन घेऊन पुरेसे सायकल स्टॅण्ड बनविण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने करावयाची आहे.

मंत्रालयात आपातकालिन परिस्थिती हाताळण्यासाठी अग्निशामक वाहन तातडीने प्रवेश करू शकेल अशी व्यवस्था मंत्रालय सुरक्षा कक्षाने करावी तसेच मंत्रालय परिसरात ALS रुग्णवाहिका अद्ययावत सुविधांसह २४ तास कार्यरत ठेवण्याची कार्यवाही सार्वजनिक आरोग्य विभागाने करावयाची आहे.

मंत्रालय सुरक्षेसाठी phase-I अंतर्गत Drone यंत्रणा पुरविण्यात आली आहे. ही यंत्रणा सद्य:स्थितीत नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले आहे. मंत्रालय सुरक्षेच्या दृष्टीने ही यंत्रणा अत्यंत आवश्यक असल्याने वार्षिक देखभाल दुरुस्ती करार सुरक्षा यंत्रणेने तत्काळ करुन घ्यावे तसेच Droneच्या माध्यमातून मंत्रालय सुरक्षेचा आढावा नियमितपणे घेण्यात यावा.

वरील मार्गदर्शक सूचनांपैकी कोणत्याही सूचनेचा भंग झाल्यास संबंधित व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन कारवाई करण्यात येईल. (समाप्त)

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲप लवकरच आणणार सिक्रेट कोड फिचर

व्हॉट्सॲप हे एक लोकप्रिय मेसेजिंग ॲप आहे. व्हॉट्सॲप डेव्हलपर्स वापरकर्त्यांना आपले चॅट्स लॉक करता यावेत म्हणून एका नवीन फीचरवर काम करीत आहे. व्हॉट्सॲप चॅट लॉक करण्यासाठी सिक्रेट कोड या फीचरचे टेस्टिंग करीत आहे. लवकरच लॉन्च होणारे हे फिचर लिंक असलेल्या डिव्हाइसवर काम करेल आणि वापरकर्त्यांना सुरक्षित चॅट फोल्डरसाठी एका कस्टम पासवर्डचा वापर करण्यासाठी परवानगी देईल. मेटा व्हॉट्सॲपची मूळ कंपनी आहे. व्हॉट्सॲप आपल्या वापरकर्त्यांसाठी सतत नवनवीन फीचर्स आणि अपडेट्स आणत असते. जेणेकरून वापरकर्त्यांना ॲप वापरताना अधिक चांगला अनुभव मिळावा.



व्हॉट्सॲपच्या नवनवीन फीचर्स आणि अपडेट्सवर लक्ष ठेवणाऱ्या WABetaInfoच्या एका रिपोर्टनुसार, हे फिचर सर्वात पहिल्यांदा अँड्रॉइड २.२३.२१.९ च्या व्हॉट्सॲप बीटावर पाहण्यात आले होते, जे गुगल प्ले स्टोअरवरून डाउनलोड केले जाऊ शकते.

नवीन सिक्रेट कोड फिचर वापरकर्त्यांना ॲपच्या सर्च बारमधून लॉक करण्यात आलेल्या चॅट्सना अधिक सोप्या पद्धतीने शोधण्यासाठी मदत करेल. तसेच तुम्ही जर का तुमचे अकाउंट एकापेक्षा डिव्हाइसवर लिंक केले असेल तर तिथेही तुम्ही चॅट लॉक करता येणार आहे. खाली दिलेल्या स्क्रिनशॉटमध्ये तुम्ही पाहू शकता. व्हॉट्सॲप तुम्हाला एखादा साधा शब्द किंवा ईमोजी वापरण्यास सांगते, जेणेकरून तुम्ही लोकच केलेलं चॅट लगेच शोधू शकता.

या वर्षी मे महिन्यामध्ये व्हॉट्सॲपने चॅट लॉक हे फिचर लॉन्च केले होते. मात्र सेकेंडरी डिव्हाइसवर चॅट लॉक करण्याचा कोणताही पर्याय नसल्याने वापरकर्ते नाराज होते. तथापि, नवीन बीटा फिचर स्टेबल व्हर्जनवर आल्यास वापरकर्ते लिंक डिव्हाइसवर आपले चॅट्स खाजगी ठेवण्यास सक्षम असणार आहेत. सध्या कंपनी सिक्रेट कोडवर काम करीत आहे. हे सर्वांसाठी उपलब्ध होण्यासाठी काही आठवडे किंवा काही महिने लागू शकतात. मागील काही महिन्यांमध्ये व्हॉट्सॲप डेव्हलपर्सने ॲपमध्ये अनेक फिचर जोडले आहे जसे की, टेलिग्राम सारखे चॅनेल, एचडी फोटोज आणि व्हिडीओ शेअर करणे, नाव न देता ग्रुप तयार करणे, चॅट एडिट करणे असे अनेक फीचर्स लॉन्च केले आहेत.

# संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर



निमित्त

भारतीय संगणक शास्त्रज्ञ, माहिती तंत्रज्ञानातील नेते आणि शिक्षणाचे वकील विजय पांडुरंग भाटकर सर्वांना परिचित आहेत. भारतातील परम या सुपर कॉम्प्युटरच्या बांधकामाची देखरेख करण्यासाठी ते प्रसिद्ध आहेत. भारत सरकारने त्यांना पद्मभूषण आणि पद्मश्री आणि महाराष्ट्र सरकारने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केलेला आहे.

डॉ. विजय भटकर यांचा जन्म ११ ऑक्टोबर १९४६ रोजी महाराष्ट्रात अकोला जिल्ह्यातील मुरांबा येथे झाला. मूर्तिजापूर येथील संत गाडगे महाराजांनी स्थापन केलेल्या शाळेत त्यांचे शिक्षण झाले. शालांत परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या डॉ. भाटकरांनी वयाच्या १८व्या वर्षी अभियांत्रिकी पदवी मिळवली. बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठातून एमटेक केल्यानंतर ते दिल्लीच्या आयआयटीमध्ये दाखल झाले. वयाच्या अवघ्या २६व्या वर्षी त्यांनी डॉक्टरेट मिळवली. त्यांनी आयआयटी दिल्ली, नागपूर येथील सर विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि एमएस वडोदरा येथील विद्यापीठात अनुक्रमे १९६५मध्ये अभियांत्रिकी पदवी आणि १९६८मध्ये अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी घेतली. पुण्यातील सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंगमध्ये डॉ. भाटकर यांनी १९८७मध्ये सुपर कॉम्प्युटर तयार करण्याच्या प्रकल्पावर देखरेख केली. यामुळे भारतातील पहिले सुपर कॉम्प्युटर, परम ८००० आणि परम १०००० तयार झाले.

डॉ. भटकर यांनी त्यांच्या इतर कर्तृत्वाव्यतिरिक्त ८०हून अधिक संशोधने लिहिली, संपादित केली आणि तयार केली. कॉम्प्युटर सायन्सच्या क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्लीच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे ते अध्यक्ष आहेत. या व्यतिरिक्त ते विज्ञान भारतीचे नेते आहेत. आयआयटी दिल्लीने त्यांना १९७२मध्ये अभियांत्रिकीमध्ये पीएचडी प्रदान केली. आयटी शिक्षण आणि संशोधन अधिक करण्यासाठी डॉ. भटकर यांनी आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान संस्थेची स्थापना केली. या संस्थेत अध्यापनासह उच्च शिक्षण संशोधन सुविधांचे नियोजन करण्यात आले.

डॉ. भटकर यांनी लिहिलेल्या आणि संपादित केलेल्या बारा पुस्तकांचे प्रकाशन झाले आहे आणि त्यांनी ऐंशीहून अधिक संशोधनात्मक लेखही दिले आहेत. २०३०पर्यंत भटकरांच्या मते, भारत चीन आणि अमेरिका या दोघांनाही मागे टाकून जगातील आघाडीचे राष्ट्र बनणार आहे. राष्ट्राला सशक्त, दूरदर्शी प्रतिनिधित्व आणि त्यासाठी योग्य दिशा हवी आहे. रॉयल सोसायटीने २००३मध्ये शास्त्रज्ञांचा एक गट दक्षिण आफ्रिकेत पाठवला आणि विजय भटकर यांनी त्यांचे नेतृत्व केले.

संत गाडगे महाराजांचा आदर्श समोर ठेवून विज्ञान व अध्यात्माची सांगड घालत ते कार्यरत आहेत. संपूर्ण देशातील तीर्थक्षेत्रे 'ज्ञानतीर्थक्षेत्रे' व्हावीत यासाठी आळंदीपासून त्या स्वरूपाचे काम त्यांनी सुरू केले आहे. युरोपियन संस्कृतीचा अभ्यास करणारे तसेच आध्यात्मिक अनुभूतीसाठी ध्यानधारणा करणारे व आजही सक्षमतेने कार्यरत असलेले डॉ. विजय डॉ. भटकर भारतीय युवकांचे आदर्श ठरलेले आहेत. **(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**कोल्हापूर : पावसाळा संपत आला असला तरी याआधी पाऊस पडून गेला असल्याने रस्त्याच्या दुतर्फा निसर्गसंपदा दिसून येते.**

## आरोग्य प्रहर

# किशोरवयात येणाऱ्या मुलींनी असा आहार घ्यावा



किशोरवयात येण्यापूर्वी मुलींमध्ये अनेक शारीरिक आणि मानसिक बदल दिसून येतात. या वयात मुली जो आहार घेतात, त्याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे जास्तीत जास्त पौष्टिक पदार्थांचा त्यांच्या आहारात समावेश करणे खूप जास्त गरजेचे आहे. याविषयी न्युट्रिशनिस्ट शालिनी सुधाकर सांगतात, लहान मुले काय खातात हे त्यांच्या शारीरिक आणि हार्मोनल आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे असते. विशेषत: किशोरवयात येण्यापूर्वी मुलींनी चांगल्या हार्मोनल आरोग्यासाठी पोषक तत्त्वे असलेल्या पदार्थांचे सेवन करणे गरजेचे आहे

शालिनी सुधाकर पुढे सांगतात, तरुण मुलींनी चांगले हार्मोनल आरोग्य आणि नियमित निरोगी मासिक पाळी येण्यासाठी तीन महत्त्वाचे पदार्थ खाणे गरजेचे आहे. शरीरातील हिमोग्लोबिन संतुलित ठेवण्यासाठी आणि हार्मोनल आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी लोह महत्त्वाची भूमिका बजावते. किशोरवयात येण्यापूर्वी मुलींनी दररोज एक चमचा शेवग्याच्या पानांची पावडर खावी. जवसामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह आणि व्हिटॅमिन सी, ई व केचे प्रमाण अधिक असते. हे पोषक घटक सर्व वयोगटांतील व्यक्तींना हार्मोन्स संतुलित ठेवण्यास मदत करते. अंजीर हे पोषक तत्त्वे पुरवणारा सर्वांत चांगला पर्याय आहे. त्यात असलेले अँटिऑक्सिडंट्स आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत करतात त्याशिवाय अंजीर रक्त शुद्धीकरण आणि शरीरातील हिमोग्लोबिनची मात्रा वाढवण्यासाठी अधिक फायदेशीर आहे.

या संदर्भात खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलच्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुरभी सिद्धार्थ सांगतात, किशोरवयात येण्यापूर्वी मुलींना तीन प्रकारचा आहार सर्वांगीण आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतो. या मुलींना हाडांसाठी कॅल्शियम आवश्यक असते. त्यासाठी दूध, दही व चीजसारख्या दुग्धजन्य पदार्थांचे सेवन करणे गरजेचे आहे. ज्या मुलींना दुग्धजन्य पदार्थ खाण्याची मनाई असेल किंवा निर्बंध असेल त्यांनी कॅल्शियमची मात्रा अधिक असलेल्या हिरव्या पालेभाज्या खाव्यात. त्यात ब्रोकोली हा एक चांगला पर्याय आहे. लोहासाठी मासे, मसूर आणि भरपूर प्रमाणात तृणधान्याचे सेवन करावे, तर फायबरयुक्त पदार्थ पचनक्रिया सुरळीत ठेवण्यासाठी खावेत.

# आमच्या नेत्यांवर बिनबुडाचे आरोप सहन केले जाणार नाहीत -माजी गटनेते अनिरुध्द पाटील

**पेण : प्रतिनिधी**

पेणमध्ये उद्धव ठाकरे गटाच्या वतीने झालेल्या जाहीर सभेत पेण अर्बन बँक प्रकरणातील मुख्य आरोपी शिशिर धारकर याने आमचे नेते आमदार रविशेठ पाटील व माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्यावर जे आरोप केले आहेत त्याचा आम्ही भारतीय जनता पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करीत असून यापुढे असे आरोप खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा नगर परिषदेचे माजी गटनेते अनिरुद्ध पाटील यांनी भाजप कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत विरोधकांना दिला आहे.

या पत्रकार परिषदेस पेण अर्बन बँक संघर्ष समितीचे अध्यक्ष नरेन जाधव, माजी नगरसेवक अजय क्षीरसागर, शोमेर पेणकर, परशुराम पाटील तसेच स्वप्नील म्हात्रे, रवींद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले की, पेणमध्ये गेल्या अनेक वर्षांत रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामे झाली असून यामुळे विरोधकांना पोटशूळ उठला असून गेली १३ वर्षे राजकारणापासून अलिप्त असलेले



पेण बँक प्रकरणातील मुख्य आरोपी शिशिर धारकर अचानक प्रकट होऊन त्यांनी राजकीय व्यासपीठावरून बेछूट आणि खोटे आरोप करून आमच्या नेत्यांची व पक्षाची प्रतिमा मालिन करण्याचे काम केले असून त्यास जशास तसे उत्तर दिले जाईल.

भाजी मार्केट, रिंगरोड, पाणी शुद्धीकरण प्रकल्पसारखी शासनाच्या माध्यमातून ठरलेली कामे असून याबाबतीत आमच्या नेत्यांचे किंवा आमचे संबंध काय, असा सवाल उपस्थित करून अनिरुध्द पाटील म्हणाले की, खोटे बोल, पण रेटून बोल अशी शिशिर धारकर यांची भूमिका असून या माध्यमातून पेणकरांना भूलविण्याचे काम करण्यात येत आहे. जलशुद्धीकरण प्रकल्पाचे पैसे अर्बन बँकमध्ये ठेवण्याचे पाप कोणी केले हे सर्वसामान्य जनतेला ज्ञात आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अनंत गीते यांनी आरोपीला पक्षात घेऊन स्वतः च्याच पक्षाची प्रतिमा मालिन करण्याचे काम केले असून यातून काय हेतू सध्या होणार हे त्यांनाच माहीत, पण आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील हे साधे बँकेचे सभासद नसताना आमच्या नेत्यांवर अर्बन बँक बुडविण्याचे जे आरोप जाहीर सभेत करण्यात आले त्या विरोधात शिशिर धारकर यांच्याविरोधात कोर्टात अब्रू नुकसानीचा दावा लवकरच दाखल करण्यात येणार आहे.

या वेळी माजी नगरसेवक शोमेर पेणकर यांनी अर्बन बँकसारख्या जिव्हाळ्याचा प्रश्न मेलेला आहे असे विधान ज्या शिशिर धारकर यांनी केलेले हे निषेधार्ह असल्याचे सांगत या प्रकरणात माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी संघर्षाची भूमिका घेत पदयात्रा काढली, पण ज्या अर्बन बँक प्रकरणात अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले, नागरिक देशोधडीला लागले त्यातील मुख्य आरोपी शिशिर धारकर आमच्या नेत्यावर आरोप करतो हे म्हणजे स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी केलेले षडयंत्र असून यापुढे अशा गोष्टी सहन केल्या जाणार नाहीत, असेही पेणकर यांनी म्हटले.

माजी नगरसेवक अजय क्षीरसागर यांनी सांगितले की, पेण अर्बन बँक वाचिवण्यासाठी आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी जे प्रयत्न केले आहेत ते जनतेला ज्ञात असून बेताल व्यक्तव्य करणाऱ्या शिशिर धारकर यांचा निषेध करीत ११ ऑक्टोबर रोजी त्यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात येणार आहे. संघर्ष समिती अध्यक्ष नरेन जाधव यांनी धारकर खोटे बोलून जनतेची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट केले. परशुराम पाटील यांनीही मत मांडले. आभार स्वप्नील म्हात्रे यांनी मानले.

# शिशिर धारकरांवर अब्रू नुकसानीचा फौजदारी दावा दाखल करणार

## आरोपानंतर खासदार सुनील तटकरे आक्रमक

**पाली : प्रतिनिधी**

ठाकरे गटात सामील झालेले शिशिर धारकर यांनी एका मेळाव्यात बोलताना पेण अर्बन बँक बुडण्यास खासदार सुनील तटकरे आणि माजी आमदार धैर्यशील पाटील जबाबदार असल्याचा आरोप केला. त्यास खासदार तटकरे यांनी जोरदार प्रत्युत्तर देत धारकर यांच्यावर अब्रू नुकसानीचा फौजदारी दावा दाखल करणार असल्याचा इशारा दिला आहे.



खासदार तटकरे पुढे म्हणाले की, ज्या वेळेस आघाडीचे राजकारण असते त्या वेळेस भूमिका वेगवेगळी असते. महाविकास आघाडी सरकारमध्ये आदिती तटकरे या रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री होत्या. आता आम्ही महायुतीत आहोत. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार याबाबत एकमताने निर्णय घेतील ते आम्ही स्वीकारू. तो निर्णय आम्हाला सर्वांना मान्य असेल. सद्यस्थितीत पालकमंत्री पदाखेरीज आगामी लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्व ताकदीने लढवून जिंकणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आम्ही भक्कमपणे उभे आहोत.

राष्ट्रवादी कुणाची याबाबत खासदार तटकरे यांनी सांगितले की, याबाबत निवडणूक आयोगाकडे प्रक्रिया सुरू असून पुढील सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यांच्या खंडपीठाने अलिकडे निकाल दिला आहे. त्या निकालात या देशातील स्वायत्त संस्था असलेल्या निवडणूक आयोगाला निर्णय घेण्याबाबत स्वतंत्र अधिकार दिले आहेत. निवडणूक आयोगानेसुद्धा स्थापन झाल्यापासून या देशात वेगवेगळ्या राजकीय पक्षांबाबत गुणवत्तेनुसार व कायद्याच्या कसोटीवर वेगवेगळे निर्णय दिले आहेत. अजितदादांच्या नेतृत्वात लोकशाहीच्या पद्धतीने आम्ही भूमिका घेतली आहे. ज्येष्ठ विधिज्ञ यांचे वारंवार मार्गदर्शन व चर्चा घेतोय. गुणवत्तेनुसार आम्ही जे पिटीशन दाखल केले आहे त्याला अनुकूल निकाल लागेल अशी अपेक्षा आहे.

# माणगावात भाजप महिला मोर्चातर्फे विविध कार्यक्रम



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात भाजप महिला मोर्चातर्फे बालाजी मंदिर या ठिकाणी माझी माती, माझा देश, पंच प्रण शपथ कार्यक्रम महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस मंजुषा कुद्रमोती यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. महिलांना नुकतेच ३३ टक्के आरक्षण लागू झाले. याबद्दल या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारचे आभार मानण्यात आले.

या कार्यक्रमास भाजप सोशल मीडियाच्या महाड संयोजिका जिगीसा बुटाला, मानवाधिकार प्रदेश सेक्रेटरी यशोधरा गोडबोले, महिला मोर्चाच्या जिल्हा सदस्य प्राजक्ता शुक्ला, अश्विनी खरे, भटका समाज तालुकाध्यक्ष निलम काळे, महिला मोर्चा शहराध्यक्ष भारती शेठ, सचिव दीक्षा देसाई, सारिका मेथा, रेश्मा सुतार, निशा सुतार आदी पदाधिकारी, कार्यकर्त्या महिला उपस्थित होत्या.

३३ टक्के मिळवून दिल्याबद्दल उपस्थित सर्व महिलांनी आनंदोत्सव साजरा करून पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्र सरकारचे आभार मानले. त्याचप्रमाणे हातात माती घेऊन माझी माती, माझा देश या सरकारी उपक्रमांतर्गत देशाप्रती असणारा आदर व्यक्त करून पंच प्रण शपथ घेतली.


याशिवाय केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोकाभिमुख योजना, उपक्रम, संदेश तळागाळातील जनतेपर्यंत पोहचविण्याचा मानस व्यक्त केला.

# मुरुडमधील सुरूची लागवड धोक्यात

**रेवदंडा : रामप्रहर वृत्त**

रेवदंडा गावाला सुमारे तीन किलोमीटर लांबीचा निसर्गरम्य समुद्रकिनारा लाभला आहे. पर्यटनाला चालना मिळावी तसेच किनारपट्टीचे संरक्षण योजनेंतर्गत सामाजिक वनीकरण विभागातर्फे सुरुच्या झाडांची लागवड करण्यात येत आहे, मात्र काही जण फांद्या छाटत असल्याने झाडांना धोका निर्माण झाला आहे.

किनाऱ्यालगत दोन वर्षांत सुरुचे वन साकारण्यात येणार आहे. लागवड केलेल्या रोपांची योग्य वाढ होत आहे, मात्र काही जण सुरुच्या फांद्या छाटत आहेत



तसेच बंधाऱ्याअभावी किनाऱ्याची धूप होत असल्याने धोका निर्माण झाल्याची माहिती स्थानिक नागरिक तेजस शिंदे यांनी दिली. दोन वर्षांसाठी १,१२५ सुरु लागवड करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. सामाजिक वनीकरण विभागाकडून हा उपक्रम राबवण्यात येत असून झाडांमुळे किनाऱ्याची धूप थांबण्यास मदत होते. काही वर्षांपूर्वी पैशांच्या हव्यासापोटी तसेच जळणासाठी वृक्षतोड करण्यात आली होती. काही दिवसांपासून किनाऱ्यावर वाळूउपसाही केला जात आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने हा प्रकार घातक असून यावर कारवाईची मागणी सामाजिक कार्यकर्ते सलीम तांडेल यांनी केली आहे.

> **सुरुच्या झाडांची लागवड सामाजिक वनीकरण विभागाकडून करण्यात आली आहे. पहिली तीन वर्षे विभागाकडूनच झाडांची निगा राखली जाते. त्यानंतर देखभालीची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे येते.**
>
> **–प्रदीप दिवकर, ग्रामविकास अधिकारी, रेवदंडा**

# तांबडी आदिवासीवाडीत कॅन्सर जनजागृती शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

आदिवासी समाजात कॅन्सरबाबत असलेले गैरसमज, विडी, तंबाखू तसेच तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणारे कॅन्सर व महिलांना स्तन कॅन्सर किंवा अंतर्भागाचे कॅन्सर असताना त्याची लक्षणे माहिती नसल्यामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे. हे लक्षात घेऊन डॉ. राखी धिंग्रास पिस अॅन्ड एज्युकेशन ट्रस्ट आणि ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था बांधणवाडी यांच्या वतीने तांबडी ठाकूरवाडीत टाटा मेमोरियल सेंटर खोपोलीच्या सहकार्याने कॅन्सर जनजागृती शिबिर घेण्यात आले.

या शिबिरास ग्रामसंवर्धनचे अध्यक्ष संतोष ठाकूर, डॉ. राखी धिंग्रा, टाटा मेमोरियल सेंटर कॅन्सर प्रतिबंध विभागाच्या प्रकल्प व्यवस्थापक डॉ. प्रतिभा पाटील, स्नेहल डी. के., सामाजिक कार्यकर्त्या मानसी पाटील, सुनील वाघमारे, राजू पाटील, संदीप पाटील आणि समुपदेशक मृणाल शिंत्रे, मंगल वाघमारे, जनीबाई खाकर, यशवंत खाकर, हरिश्चंद्र खाकर, नरेश कडू, गीता वाघमारे यांच्यासह तांबडीतील बहुसंख्य आदिवासी महिला, पुरुष उपस्थित होते.

आदिवासी बांधवांनी इच्छा दर्शविल्यास लवकरच मोफत कॅन्सर निदान शिबिर लावण्यात येणार असून टाटा मेमोरियल सेंटर कॅन्सर विभागाची सर्व वैद्यकीय टीम या शिबिरास उपस्थित राहील, असे डॉ. प्रतिभा पाटील यांनी या वेळी आश्वस्त केले.



# श्रीवर्धनमध्ये पेशवे स्मारकाची प्रतीक्षा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धनची ओळख पेशव्यांची जन्मभूमी म्हणून करून दिली जाते. येथे पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचा पुतळा आहे. आता राज्यात महायुतीचे राज्य असल्याने श्रीवर्धनमध्ये पेशव्यांचे स्मारक व्हावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट व बाजीराव पहिले यांचा जन्म श्रीवर्धनच्या भूमीत झाला. बाळाजी विश्वनाथ यांची मुत्सद्देगिरी पाहून त्यांना पहिल्या मराठेशाहीच्या पेशवेपदाची सूत्रे सोपविण्यात आली, मात्र बाळाजी विश्वनाथ यांचा कमी वयातच मृत्यू झाल्यामुळे पहिले बाजीराव यांना पेशवाईची सूत्रे स्वीकारावी लागली. पहिले बाजीराव हे अत्यंत शूर योध्ये होते. त्यांनी इंग्रज व मुघलांबरोबर जेवढ्या लढाया केल्या त्यामध्ये एकही लढाई ते हरले नव्हते. इतिहासात २१ मोठ्या लढाया लढणारे व त्या सर्व लढाया जिंकणारे बाजीराव पेशवे हे एकमेव योद्धे होते.

आजमितीला श्रीवर्धनमध्ये पर्यटन व्यवसाय खूप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारे पाहण्यासाठी असंख्य पर्यटक या ठिकाणी येत असतात. हरिहरेश्वर येथील हरेश्वर मंदिर व काळभैरव योगेश्वरी मंदिर तसेच या ठिकाणाचा सुंदर समुद्रकिनारा, त्याचप्रमाणे दिवेआगर येथील सुवर्णगणेश मंदिर व त्या ठिकाणाचा समुद्रकिनारा पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत असते.

श्रीवर्धन शहरातदेखील मोठ्या संख्येने पर्यटक येतात. येथील समुद्रकिनाऱ्यावर अंदाजे तीन किलोमीटर लांबीचा सुशोभित असा धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्यात आलेला आहे. ७५२ किलोमीटर लांब असलेल्या कोकण किनारपट्टीवर अशा प्रकारचा बंधारा कुठेही अस्तित्वात नाही. त्यामुळे पर्यटकांना या बंधाऱ्यांचे विशेष आकर्षण आहे.

श्रीवर्धन येथील लक्ष्मीनारायण देवस्थान ट्रस्टचे एक शिष्टमंडळ राज्यात मंत्री असलेल्या व श्रीवर्धनच्या आमदार असलेल्या आदिती तटकरे यांना भेटण्यासाठी मंत्रालयात गेले होते. त्या वेळी सकारात्मक चर्चा होऊन मंत्री तटकरे यांनी लवकरात लवकर आराखडा तयार करून पेशवे मंदिरासाठी निधीची तरतूद करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. त्यामुळे हे काम मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.

# खालापूर तालुक्यात आचारसंहिता लागू

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील २२ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक व एका ग्रामपंचायतची पोटनिवडणूक जाहीर आहे. त्यामुळे तालुक्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली असल्याचे तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी आयुब तांबोळी यांनी म्हटले आहे.




खालापूर तालुक्यात होनाड, आत्करगाव, ठाणेन्हावे, जांबरुंग, बीडखुर्द, मानकिवली, सावरोली, कुंभिवली, तांबाटी, नंदनपाडा, जांभिवली तर्फे छत्तिशी, शिरवली, खानाव, चीलठण, नारंगी, वासंबे, चांभार्ली, माजगाव, इसांबे, वावर्ले, बोरगाव, वरोसे या २२ ग्रामपंचायतींबरोबर उंबरे ग्रामपंचायतीच्या एका जागेसाठी पोटनिवडणूक आहे.

तालुक्यातील ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त ग्रामपंचायतीच्या निवडणुका असतील. तर पूर्ण तालुक्यात आदर्श आचारसंहिता लागू होते, असा नियम झाला असून निवडणूक लागलेल्या ग्रामपंचायतीच्या सिमेजवळील ग्रामपंचायतीलाही तो नियम लागू आहे. खालापूर तालुक्यात एकूण ४४ ग्रामपंचायत आहेत,त्यातील २२ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व एक पोटनिवडणूक आहे. त्यामुळे पूर्ण तालुक्यात आचारसंहिता लागू झाली आहे.

# माणगाव तालुक्यात भातपीक पूर्ण तयार

## कापणीची लगबग; मजुरांचा शोध सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग होत असताना त्यासाठी लागणारे मजूर दुर्मीळ होऊ लागले आहेत. त्यामुळे शेती करणे परवडेनाशी झाली असून शेतकरी अडचणीत येत आहे. यंदा भातलावणी उशिरा झाल्यामुळे भातकापणी ही तब्बल १५ दिवस उशिरा होणार आहे. हळवे व वेळेत लागवड केलेले भातपीक कापणीसाठी तयार झाले आहे. या शेतीच्या कामावर कमी मजूर, कमी वेळ व कमी खर्चात कसे जास्तीत जास्त उत्पन्न मिळेल यासाठी पिकांच्या उत्पादनासह त्यावर होणारा खर्चही कमी करण्यासाठी नवनवीन प्रयोग शासनाकडून सुरु आहेत. अद्याप



पाऊस गेला नसल्याने शेतकरी भात कापणीसाठी द्विधा मनस्थितीत आहेत. जे मिळेल ते मजूर किंवा घरातीलच लहान थोर मंडळी नजीकच्या काळात भात कापणीच्या तयारीला लागणार आहेत, तर काही शेतकरी मजूरच कामावर मिळत नसल्यामुळे पुरता चिंतेत सापडले आहेत. अशा वेळी आधुनिक यांत्रिकीकरणामुळे भात पीक कापणी स्वस्त झाली असून याचा शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

माणगाव तालुक्यातील भातपीक पूर्ण तयार झाले असून ते कापणीयोग्य झाले आहे. तालुक्यात यंदा १२,५०० हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड खरीप हंगामात केली गेली. या वेळी भाताच्या सुप्रीम व सुपर सोना, कर्जत ३, कर्जत ४, कर्जत ५, कर्जत ७, जया, रत्न, सुवर्णा, रत्नागिरी, अजया या जाती, तर संकरित वाणात सह्याद्री ३, सह्याद्री ४ या जातीच्या पिकाची लागवड शेतकऱ्यांनी केली असून हे पीक कापणीसाठी तयार झाले आहे.

या पिकाची कापणी ती ही वेळत व्हावी यासाठी शेतकरी हाताला मिळेल तो मजूर घेऊन सज्ज झाला आहे. सध्या कमी मजुरांची संख्या होऊ लागल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न उभारला आहे. काही शेतकऱ्यांनी या मजुरांवर अवलंबून न राहता आपल्याच घरातील भावकीची मंडळी घेऊन भात कापणी सुरु केली आहे. आधुनिक यांत्रिकीकरणामुळे सुधारित पद्धतीने भातकापणी केल्यास शेतकऱ्यांची कमी वेळात, कमी खर्चात भातपीक कापणी होणार आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

# कौशल्य प्रशिक्षणातून महिला सक्षमीकरण –सुशील रुळेकर

**रोहा : रामप्रहर वृत्त**

एक्सल इंडस्ट्रीजचे श्री. विवेकानंद प्रशिक्षण व संशोधन केंद्राच्या माध्यमातून जेएसएस संस्था रोहा परिसरात कौशल्य प्रशिक्षणातून महिला सक्षमीकरण करीत आहे, असे प्रतिपादन एक्सल इंडस्ट्रीचे सीएसआर प्रमुख सुशील रुळेकर यांनी केले.

जन शिक्षण संस्थान रायगड आणि एक्सल इंडस्ट्रीजचे श्री. विवेकानंद प्रशिक्षण व संशोधन केंद्राच्या माध्यमातून रोहा येथे सोमवारी (दि. १०) ज्यूट बॅग मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. त्या वेळी श्री. रुळेकर बोलत होते.

उपक्रमास स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे सचिव प्रदीप



पाटील, कृषी विभाग प्रमुख प्रसाद दगडे, प्रतिनिधी अनिता घोसाळकर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील, प्रशिक्षिका सारिका पाशिलकर, मीना सांडगे व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या वेळी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पाटील यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथ देण्यात आली.

संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्याभरात जेएसएसच्या माध्यमातून विविध कौशल्य उपक्रम राबिवले जात असताना कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण जिल्ह्यात व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्षांपासून सक्रियपणे सुरू आहेत.

# नवी मुंबईत ‘आयुष्मान भव’ प्रभावी

## १४४९ गर्भवती व १०७६ बालकांची तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र शासन देशभर १७ सप्टेंबरपासून ‘आयुष्मान भव’ मोहीम राबवित आहे. या मोहिमेच्या माध्यमातून विविध स्तरावर आरोग्यविषयक सेवा देण्यात येत आहे. या राष्ट्रीय मोहिमेचा शुभारंभ राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १३ सप्टेंबर रोजी करण्यात आला. या मोहिमेमध्ये दर आठवड्यातील शनिवारी आरोग्य मेळावा आयोजित केला जात आहे.

या मेळाव्यात पहिल्या आठवड्यात असंसर्गजन्य आजार, दुसऱ्या आठवड्यात क्षयरोग, कुष्ठरोग आणि अन्य संसर्गजन्य आजारांची तपासणी करण्यात आली. तिसऱ्या आठवड्यात माता व बाल आरोग्य, चौथ्या आठवड्यात डोळ्यांची तपासणी व डोळ्यांचे आरोग्य या संकल्पनेनुसार कार्यवाही केली जाणार आहे.

या मेळाव्यादरम्यान आभा कार्ड तयार करण्यात येणार आहे. या माध्यमातून सर्वसमावेशक आरोग्य सेवा, आयुष, मानसिक आरोग्य, वाढत्या वयातील आजार



व उपचार, मौखिक आरोग्य, नेत्र, कान, नाक व घसा यांचे आरोग्य, समुपदेशन सेवा, योगा व वेलनेस उपक्रम, मोफत औषधी, प्रयोगशाळा तपासणी तसेच टेली कन्सल्टेशन सेवा देण्यात येत आहेत.

‘निरोगी आयुष्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे’ या उद्देशाने १८ वर्षावरील पुरुषांची उंची, वजन, मधुमेह, रक्तदाब, हिमोग्लोबिन, रक्तक्षय, मोखिक कर्करोग याबाबतची तपासणी करण्यात येत असून तंबाखू, गुटखा, सिगारेट, दारू या व्यसनांविषयी समुपदेशन करण्यात येत आहे.

नवी मुंबई महापालिका आरोग्य विभागाच्या वतीने नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ‘आयुष्मान भव आरोग्य मेळावा’ आयोजित करण्यात येत आहे. दि. ७ ऑक्टोबर रोजी माता, बाल आरोग्य व पोषण आरोग्य सुविधा राबविणे याविषयी नमुंमपाची रुग्णालये व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र या स्तरावर व्यापक रितीने आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यामध्ये १४४९ गर्भवती मातांची तज्ज्ञांमार्फत वजन, मधुमेह, रक्तदाब, हिमोग्लोबिन, लघवी तपासणी अशी विविध प्रकारची तपासणी करण्यात आली तसेच याबाबतचे समुपदेशन देखील करण्यात आले. त्यांना बाळाचे वजन, आहार, व्यायाम याविषयी आरोग्य शिक्षण देण्यात आले.

याचप्रमाणे १०७६ बालकांचीही तज्ज्ञांमार्फत आरोग्य तपासणी करून वजन, लसीकरण, अनेमियामुक्त भारत अंतर्गत देण्यात येणारी औषधे याबाबतची स्थिती जाणून घेऊन त्याबाबतची महत्तवपूर्ण माहिती देण्यात आली. स्तनपान, आहार, कुपोषण याविषयी समुपदेशन करण्यात आले. ७ सप्टेंबर २०२३ रोजीच्या आरोग्य मेळाव्यास गरोदर माता व पाच वर्षाआतील बालकांचा मोठया प्रमाणावर उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

यापुढील आयुष्मान भव आरोग्य मेळाव्यास नागरिकांनी अशाच प्रकारे मोठया संख्येने प्रतिसाद द्यावा व १८ वर्षावरील पुरुषांनी नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन आरोग्य तपसणी करून घ्यावी, असे आवाहन नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

### आरोग्यसेवांचा जागर

महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शननुसार नवी मुंबई महापालिकेच्या वतीनेही या मोहीमेचे प्रभावी आयोजन करण्यात येऊन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या नियंत्रणाखाली सर्व आरोग्य अधिकारी,कर्मचारी यांना अवयवदानाची प्रतिज्ञा देऊन मोहिमेस सुरवात करण्यात आली. यामध्ये आयुष्मान भव शब्दाप्रमाणे सर्वांना सुदृढ आरोग्य मिळावे या हेतूने मोहिमेच्या माध्यमातून आरोग्य सेवांचा जागर करण्यात येत आहे.

# अनधिकृत बांधकामाविरोधात भाजपच्या पदाधिकाऱ्याचे उपोषण

**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा विभागात नव्याने होत असलेल्या अनधिकृत बांधकामा विरोधात भाजपचे दिघा विभाग तालुका अध्यक्ष त्रिभुवन सिंह ठाकूर यांनी आक्रमक भूमिका घेऊन दिघ्यातील जनतेला मोकळा श्वास देण्याचा प्रयत्न करीत आहेत.



याच पार्श्वभूमीवर होत असलेल्या अनधिकृत बांधकामाविरोधात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ महापे यांना अनधिकृत बांधकामाविषयी वारंवार लेखी पत्र देऊनदेखील, एमआयडीसीचे अधिकारी या तक्रारीकडे दुर्लक्ष करून त्या अर्जाला केराची टोपली दाखवत आहेत. अशा मुजोर अधिकाऱ्याच्या विरोधात व अनधिकृत बांधकाम करणाऱ्या भूमाफिया विरोधात लढा देण्याचा निश्चय श्री. ठाकूर यांनी केला आहे.

यापूर्वी १२ सप्टेंबर रोजी भाजपच्या वतीने आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला होता, परंतु महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ महापे यांनी लेखी पत्र देत व पावसाळ्याचे कारण देऊन सप्टेंबरमधील आमरण उपोषण मागे घेण्यास सांगितले व ३० सप्टेंबरनंतर आम्ही अनधिकृत बांधकामे तोडू असे लेखी उत्तर दिले त्यांच्या त्या पत्राचा आदर करीत सप्टेंबरमध्ये होणारे उपोषण स्थगित केले होते, परंतु आता ऑक्टोबर महिन्यात ९ तारीख आलेली असतानादेखील कुठल्याही अधिकाऱ्यांनी ठोस भूमिका घेऊन अनधिकृत बांधकामावर कारवाई केलेली नाही. अधिकारीवर्ग व भूमाफिया यांच्या संगनमताने दिघा तेथील अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.

सुज्ञ नागरिकांकडून तक्रारी आल्या तर कानाडोळा करत आहेत म्हणून अशा मजूर अधिकाऱ्यांच्या विरोधात बुधवारी (दि. ११) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ महापे कार्यालयाच्या बाहेर जोपर्यंत अनधिकृत बांधकाम तोडण्यात येत नाही व संबंधित अधिकाऱ्यावर व भूमाफियावर गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिघा भाजप तालुका अध्यक्ष त्रिभुवन सिंग ठाकूर व भाजप पदाधिकारी यांनी दिला आहे .

# रसेश्वर मंदिराजवळील स्मशानभूमीची डागडुजी



**रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी येथील पाताळगंगा नदीच्या किनारी रसेश्वर मंदिराच्या जवळ असणाऱ्या स्मशानभूमीची गेली काही वर्षापासून अत्यंत दुरावस्था झाल्याने येथील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती, परंतु उशिरा का होईना येथील स्मशानभूमी सुस्थितीत होत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रसायनी येथील पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राकडे जाणाऱ्या रसेश्वर मंदिराजवळ पातळगंगा नदीच्या किनारी खूप जुनी स्मशानभूमी आहे यापूर्वी या स्मशानभूमीची देखभाल एचओसी लि. कंपनी करत होती. त्यानंतर स्मशान भूमीवरील पत्रे उडाले स्मशानभूमी सभोवतालच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे वाढली शिवाय सर्वत्र काळोख व अंधारमय वातावरण निर्माण झाल्याने या स्मशानभूमीला बकाल स्वरूप प्राप्त झाले होते त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. अलीकडे या स्मशानभूमीची चांगल्या पद्धतीने जात आहे व पत्रे बदलले आहेत साफसफाई केली आहे.

# मुंब्रा–पनवेल मार्गावर रासायनिक टँकर कलंडला

**पनवेल : वार्ताहर**

२५ मेट्रीक टन हायड्रोजन पेरॉक्साइड ड्रमने भरलेला टँकर मुंब्रा पनवेल महामार्गावरील नावडे फाटा येथे मंगळवारी सकाळी पावणेसात वाजता कलंडला. टँकर कलंडल्यानंतर त्यातून धूर येऊ लागल्याने परिसरात घबराट पसरली. नावडे फाटा येथे महामार्गालगत शाळा असल्याने पोलिसांनी तातडीने नावडे फाटा ते रोडपाली जंक्शन या दरम्यानची रस्त्यावरील वाहतूक बंद ठेवली.

मुंब्रा पनवेल ही वाहतूक थेट उड्डाण पुलावरून सुरू होती. टँकर कलंडल्यानंतर संबंधित टँकरचा



चालक हा टँकरमध्ये अडकल्यामुळे या महामार्गावरील प्रवाशांनी टँकरची काच फोडून चालकाला सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन दलाला बोलावण्यात आले. तळोजा पोलीस ठाणे तळोजा वाहतूक शाखा आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी रस्त्यावर पसरलेले हायड्रोजन पॅरॉक्साईड रसायनावर पाणी मारून रस्ता स्वच्छ केला.

टँकर चालकाने दिलेल्या माहितीनुसार कल्याण येथील नॅशनल परॉक्साईड या कंपनीचा माल जेएनपीटी बंदरात घेऊन जात असताना हा अपघात झाला. रस्त्याचा अंदाज न आल्याने वळसा घेत असताना टँकर कलंडल्याचे टँकर चालकाने सांगितले. अग्निशमन दलाचे अधिकारी बी. जी. काळे यांनी दिलेल्या माहितीनुसार हायड्रोजन पेरॉक्साइड या रसायनाला आग लागल्यास त्याचा अधिक मोठा भडका होऊ शकतो, तसेच शाळा शेजारी असल्यामुळे दुर्घटना होऊ नये म्हणून शाळेच्या व्यवस्थापनाला संबंधित अपघाताची माहिती देण्यात आल्याचे अग्निशमन अधिकारी काळे यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये जागतिक टपाल दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल, कळंबोली : वार्ताहर, प्रतिनिधी**

जागतिक टपाल दिनानिमित्त नवीन पनवेल येथील पोस्ट कार्यालयाच्या मुख्य इमारतीत जागतिक टपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून ९ ते १३ ऑक्टोंबर या कालावधीत पाच दिवसाचा डाक सप्ताहाचे आयोजन केले असल्याची माहिती पोस्टमास्टर जनरल गणेश व्यंकटराव सावळेश्वरकर यांनी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली. या वेळी पोस्ट खात्याने घेतलेली आर्थिक भरारी व विकासात्मक माहिती उपस्थित पत्रकारांना दिली.

नवीन पनवेलमध्ये असलेल्या जनरल पोस्टमास्तर कार्यालयाच्या प्रमुख इमारतीमध्येही टपाल दिनाचे निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दिनानिमित्त पोस्ट कार्यालयाच्या इमारतीला रंगीबेरंगी फुग्यांनी आकर्षक अशी सजावट करण्यात आली होती. यावेळी पोस्ट मास्तर जनरल गणेश व्यंकटराव सावळेश्वरकर यांनी पत्रकार परिषद घेऊन पोस्टाच्या असलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली. पोस्ट कार्यालय सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत असे बारा तास जनतेला सेवा देऊन अजूनही जनतेच्या हृदयात अढळ स्थान मिळवणारे एकमेव शासकीय



कार्यालय असल्याची माहिती त्यांनी दिली. पोस्ट जनरल या परीक्षेत्रामध्ये नवीन पनवेलच्या कार्यालयाने तब्बल ३०० कोटीचा आर्थिक कारभार गत वर्षी करून अव्वल स्थान अव्वल मिळवले आहे. पोस्ट बँक, आधार सेवा, पासपोर्ट सेवा, विमा पॉलिसी, सुरक्षित ठेव योजना, कुरियर सेवा, राज्य देशांतर्गत व परदेशातील कुरिअर सेवा तसेच रेल्वेच्या माध्यमातून ही मोठ्या प्रमाणावर वस्तू देवाण–घेवाण सेवा ही करण्यात पोस्टाने भरारी घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

जनतेला अग्रभागी स्थान देऊन चांगल्यात चांगल्या सुविधा देण्यामध्ये पोस्टाने विविध उपाययोजना करून विविध प्रकारचे आक्रमण होऊ ही पोस्टाने टपाल सेवेबरोबरच अन्य सुविधांमध्येही मोठी भरारी घेतली आहे. जनतेच्या पसंतीत पोस्टाने स्थान मिळवून जास्तीत जास्त चांगल्या सेवा देण्यासाठी पोस्टाचे सर्व कर्मचारी झटत आहेत. पाच दिवसाच्या आयोजित करण्यात आलेल्या कार्य सप्ताहामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन पोस्टाच्या ग्राहकांसाठीच करण्यात आले आहे. या उपायोजनांचा फायदा नागरिकांनी जास्तीत जास्त करून घेण्याचे आवाहन पोस्टमास्तर जनरल गणेश व्यंकटराव सावळेश्वरकर यांनी केले आहे.

# ज्ञान मंदिरात शिक्षणाबरोबरच आरोग्य सेवा

**पनवेल : नितीन देशमुख**

निवडणूका आल्या की मतदार राजा आरोग्यम धन संपदा असे म्हणत अनेक राजकीय नेते आरोग्य शिबिर आयोजित करीत असतात. त्यानंतर पुन्हा निवडणुका येई पर्यंत काही नाही हे आपण नेहमीच अनुभवत असतो, मात्र श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, रायगड मेडिकल असोसिएशन आणि भारतीय जनता पक्ष पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मात्र गेली १५ वर्षे सातत्याने आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येते. रविवारी ८ ऑक्टोबरला पनवेलच्या खांदा कॉलनीतील सी.के.टी. महाविद्यालयात महा आरोग्य शिबिरात ११ हजारपेक्षा जास्त रुग्णाची सेवा करण्यात आल्यामुळे त्यादिवशी ज्ञान मंदिरात शिक्षणा बरोबरच आरोग्य सेवा ही घडण्याचा अपूर्व योग जुळून आला.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या अंतर्गत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल, भारतीय जनता पक्ष, पनवेल आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांनी हा योग जुळवून आणला. ’आरोग्यम धन संपदा’ असे आपण नेहमीच म्हणतो. आरोग्य चांगले असेल तर धन मिळवणे सोपे जाते. त्यामुळे आपल्या आरोग्याची काळजी घेणे हे महत्वाचे आहे. आजच्या जंक फूडच्या जमान्यात आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचे परिणाम वृध्दा अवस्थेत तर भोगायलाच लागतात पण



आज तरुण पिढीला ही भोगावे लागत आहेत. आज घडाळ्याच्या काट्यावर धावणारा माणूस जो पर्यंत आजारी पडत नाही तोपर्यंत डॉक्टरकडे जात नाही. त्यावेळी उपचार करणे अवघड होते, पण आजार होण्यापूर्वीच त्याच्यावर उपाय योजना केल्यास त्यापासून बचाव होऊ शकतो. याची जाणीव असून ही सामान्य माणूस त्याकडे दुर्लक्ष करतो.

सामाजिक कार्य करताना सतत १५ वर्ष अशा प्रकारचे शिबिर घेणे ही सोपी गोष्ट नसते. एखादा उपक्रम राबवताना काय होते याचा अनुभव ज्यांनी घेतला असेल त्यांनाच सतत १५ वर्षे आयोजित करण्यात येणार्या आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिराचे महत्व लक्षात येऊ शकते. या महाशिबिरात सर्वसाधारण रोग, महिलांचे आजार, हृदयरोग, हाडांचे रोग, मधुमेह, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, बालरोग, त्वचा व गुप्तरोग तपासणी, दंतरोग तपासणी, नाक–कान–घसा, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, ईसीजी तपासणी, कॅन्सर तपासणी, क्षयरोग तपासणी आणि औषधोपचार मोफत देण्यात आले. डोळ्यांची तपासणी व चष्मे वाटप, तसेच अपंगांना तीन चाकी सायकल वाटप, कर्णबधिरांना श्रवणयंत्र, देण्याबरोबरच मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूट बसविण्यात आले.

पनवेल तालुक्यातील खेड्यापाड्यातून लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावरील विश्वासाने लोक आले होते. ते पाहून या शिबिराचे उद्घाटन करताना केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी आपल्या भाषणात म्हटले की, आम्ही महाविद्यालयात असल्यापासून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नाव सतत ऐकत असायचो. माणसाकडे कितीही पैसा असू दे भूक लागली म्हणून भाकरी ऐवजी पैसा खाता येत नाही आणि पैसा जास्त आहे म्हणून भुकेपेक्षा जास्त अन्न खाता येत नाही त्यामुळे ठराविक रेषेपर्यंत पैशाला महत्त्व आहे. पैशाच्या राशीत झोपणाऱ्या माणसांपेक्षा प्रामाणिकपणे आयुष्यभर लोकं जोडण्याचे आणि लोकांची सेवा करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर करत असतात म्हणूनच त्यांच्या नावाला शेठ हे नाव आदराने जोडले गेले आहे. जीवन जगत असताना खऱ्या अर्थाने समाजाची सेवा कशी करावी याचे उत्तम उदाहरण रामशेठ ठाकूर आहेत. मोदीजींनी सांगितल्याप्रमाणे सेवाही समर्पण धोरणाप्रमाणे रामशेठ ठाकूर आणि त्यांची दोन्ही मुले काम करत आहेत. रामायणाने कसं जगावे शिकवले, महाभारताने कसं जगू नये शिकवले आणि समाजाला सोबत घेऊन लोकांची सेवा करण्यासाठी कसं जगावे हे भगवतगीताने शिकवले आहे. आणि कदाचित रामशेठ ठाकूर यांनी भगवतगीता वाचली असेल म्हणूनच ते अशा प्रकारचे समाजोपयोगी उपक्रमे राबवत असतात.

जीवनाला पूर्णत्वास नेण्यासाठी दोन पैलू आहेत. आपण परमेश्वराचे रूप आहोत आणि जगात सर्वत्र परमेश्वर आहे हि भावना ठेवून जगात जनार्दन शोधण्याचे काम करतो तोच अशाप्रकारचे उपक्रम राबवू शकतो. म्हणून सामाजिक संवेदनाने जो काम करतो तो उपचाराने बरा झालेल्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरच्या आनंदाने आनंदीत होतो आणि हा आनंद सामाजिक सेवेच्या माध्यमातून रामशेठ ठाकूर आणि त्यांचे सर्व सहकारी मिळवत आहेत.

समाज सर्वांगसुंदर आणि उन्नत बनवायचा असेल तर जी कर्तव्य आपल्याला पार पाडायची आहेत ती पार पाडताना धर्माचे आचरण आपण करतो म्हणून सेवेचा धर्म आत्मसात करतो तो खरा धर्म आहे. रस्ता सुंदर असेल तर रस्ता कुठे जातो विचारले पाहिजे पण धेय्य जर सुंदर असेल तर रस्ता कुठे जातो विचारायची गरज नसते लोकं आपोआप तुमच्या पाठी चालायला लागतात आणि त्या अनुषंगाने रायगडमध्ये ध्येय्य चांगले ठेवून रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संस्था काम करीत आहे. त्यामुळे समस्त समाज रामशेठ ठाकूर यांच्या पाठीशी राहून त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करीत आहे आणि ही उल्लेखनीय बाब असल्याचे नामदार कपिल पाटील यांनी अधोरेखित केले.

माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, रामशेठ ठाकूर मुळातच गुरुवर्य असल्याकारणाने दया, क्षमा, शांती या गोष्टीची शिकवण त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. समाजकार्य, राजकारण क्षेत्रात त्यांनी प्राविण्य मिळविले. स्वतःचे जीवन घडवताना समाजाच्या अडीअडचणी ओळखून समाजातील रंजल्या गांजलेल्या घटकांना सर्व स्तरावर मदतीचा हात देण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या माध्यमातून होत असल्यचे सांगितले.

### नागरिकांनी व्यक्त केले समाधान

अनेक वेळ शिबिरात लोकांची तपासणी व्यवस्थित न करताच डॉक्टर औषध लिहून देता असतात, पण याठिकाणी आपुलकीने चौकशी करून व्यवस्थित तपासणी करून औषधे दिली जात होती. त्यानंतर शिबिराला आलेल्या लोकांसाठी जेवणाची सोय ही चांगली केली म्हणून नागरीकांनी समाधान व्यक्त केले.

# कामोठ्यात गौतमी पाटीलच्या कार्यक्रमाला तरुणाईची झुंबड



**पनवेल : वार्ताहर**

गौतमी पाटील आणि वाद हे समीकरण सध्या महाराष्ट्रात चांगले गाजत आहे. अनेक ठिकाणी या कार्यक्रमाला गालबोटदेखील लागले आहे, मात्र कामोठे शहर या वादाला अपवाद ठरला आहे. कारण कामोठ्यातील गौतमी पाटीलचा कार्यक्रमामधील काही तुरळक घटना वगळता अगदी शांततेत झाला. हा कार्यक्रम ३ तासांपेक्षा जास्त वेळ झाला. या वेळी मोठा पोलीस बंदोबस्तदेखील लावण्यात आला होता.

राष्ट्रवादी पक्षाचे अजित पवार गटाचे महाराष्ट्र राज्य संघटक सचिव राजकुमार पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नृत्यागणा गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमाचे आयोजन कामोठे शहरात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला तरुणाई आणि महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने लाभली होती. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे महाराष्ट्र संघटक सचिव राजकुमार पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने कामोठे वसाहतीमध्ये महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या नृत्यच्या कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमाला मुबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई, रायगड मधील तरुणांसोबत महिलांनी मोठी उपस्थिती लावली होती.

गौतमीला बघण्यासाठी या वेळी मोठी गर्दी उफाळून आली होती, सायंकाळी मानसरोवर रेल्वे स्टेशनच्या समोरील मैदानात हा कार्यक्रम झाला. या वेळी राष्ट्रवादीचे नेते पार्थ पवार यांनी राजकुमार यांना फोन वरून शुभेच्छा दिल्या त्यासोबत विजय चिपळेकर, विकास घरत, भाजप नेते भीमराव पवार त्या सोबत अन्य मान्यवरांनी उपस्थित राहून राजकुमार पाटील यांना शुभेच्छा दिल्या. कोणताही गोंधळ होऊ नये म्हणून कामोठे पोलिसांकडून चोख बंदोबस्तदेखील ठेवण्यात आला होता.

# अलिबाग नगर परिषदेला न्यायालयाचा दणका

## वाढीव बेकायदेशीर कर आकारणी रद्द

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वच्छता कराच्या नावाखाली वाढीव आणि बेकायदेशीर आकारणी करणाऱ्या अलिबाग नगर परिषदेला न्यायालयाने दणका दिला. वाढीव आकारणी रद्द करून तक्रारदारांना सुधारित बिल देण्याचे निर्देश दिले.




अलिबाग येथील ज्येष्ठ वकील ड अजय उपाध्ये यांनी याबाबतची तक्रार न्यायालयात केली होती. अलिबाग नगर परिषदेने उपाध्ये यांना स्वच्छता करायचा नावाखाली वाढीव कर आकारणी केली होती. ही कर आकारणी बेकायदेशीर असून ती रद्द करण्यात यावी अशी हरकत त्यांनी शासन स्तरावर केली होती.

उपाध्ये राहत असलेली सदनिका ही निवासी वापरासाठी असून, त्याचा व्यवसायिक वापर केला जात नाही. त्यामुळे कुठल्याही कारण न देता वाढीव स्वच्छता कर आकारणे योग्य नसल्याचं उपाध्ये यांचे म्हणणं होतं. त्याचबरोबर शासनाने ठरवून दिलेल्या निकषांपेक्षा नगरपरिषदेकडून ज्यादा कर आकारणी केली जात असल्याचा आक्षेप त्यांनी घेतला होता. ही बाब लक्षात घेऊन

ॲड. अजय उपाध्ये यांनी २०१९ – २०२० ला अलिबाग नगरपरिषदेने अचानक लावलेल्या स्वच्छता कराला अलिबाग येथील मुख्य न्यायदंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात अपिल दाखल करुन आव्हान दिले होते. ज्याची सुनावणी मुख्य न्यायदंडाधिकारी शैलेश उगले यांच्या न्यायालयात झाली.

सुनावणी दरम्यान अलिबाग नगर परिषदेच्या वतीने वकिलांनी कोणतेही म्हणणे मांडले नाही. त्यामुळे अपील करणाऱ्या अजय उपाध्ये यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला आणि अलिबाग नगर परिषदेने १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२० या कालावधीकरीता प्रतिवर्ष रक्कम ३८० रुपये स्वच्छता कर म्हणून केलेली वाढीव आकारणी रद्द केली. उपाध्ये यांना सुधारित बिल देण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले.

# रायगड जिल्ह्यात तालुकास्तरावर अमृत कलशची उत्साहात मिरवणूक

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त केंद्र सरकारतर्फे संपूर्ण देशात 'माझी माती–माझा देश' अभियान राबविण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यात 'माझी माती–माझा देश' अभियानांतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ग्रामपंचायतींमधून अमृत कलश यात्रा काढण्यात येऊन, घराघरातून अमृत कलशामध्ये माती व तांदूळ जमा करून तालुकास्तरावर पाठविण्यात आले आहेत.

तालुकास्तरावर गावांमधून आलेल्या कलशातील माती एकत्र येऊन तालुक्याचा एक प्रातिनिधिक कलश तयार करुन, मंगळवारी (दि.१०) विधीवत पूजा करून मिरवणूक काढण्यात आली. हे कलश मुंबई व दिल्ली येथे कार्यक्रमासाठी पाठविण्यात येणार आहेत.

रायगड जिल्ह्यात 'माझी माती–माझा देश' अभियानांतर्गत जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायतींमध्ये पारंपरिक वेशभूषेत, वाजत गाजत अमृत कलशामध्ये माती व तांदूळ जमा करण्यात आले आहे. १ ते ३० सप्टेंबर या कालावधीत हे अभियान गाव पातळीवर राबविण्यात आले. यांनतर हे अमृत कलश तालुकास्तरावर पाठविण्यात आले आहेत. तालुकास्तरावर गावांमधून आलेल्या कलशातील माती एकत्र येऊन तालुक्याचा एक प्रातिनिधिक कलश तयार करण्यात आला आहे. प्रतिनिधिक कलश तयार केल्यानंतर मातीचा उपयोग अमृत वाटिका तयार करण्यासाठी करण्यात येणार आहे.



जिल्ह्यातील उरण, खालापूर, कर्जत, पेण, सुधागड, तळा, मुरुड, म्हसळा, श्रीवर्धन, रोहा, महाड, पोलादपूर या १२ तालुक्यांमध्ये मंगळवारी प्रतिनिधिक कलशाची मिरवणूक काढण्यात आली. तर उर्वरित अलिबाग, माणगाव, पनवेल तालुक्यांमध्ये पुढील दोन दिवसांत कलश तयार करून मिरवणूक काढण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यातील दोन स्वयंसेवक हे कलश मुंबई येथील कार्यक्रमासाठी घेऊन जातील. यानंतर हे कलश दिल्ली येथील कार्यक्रमासाठी पाठविण्यात येणार आहेत.

# माथेरानमध्ये पर्यटकाच्या वाहनाला लागली आग



**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान या दस्तुरी नाक्यावर एका पर्यटक वाहनाला आग लागल्याची घटना घडली. दरम्यान, येथे उपस्थित असणारे पोलीस विभाग, वन कर्मचारी तर स्थानिक तरुणाच्या पुढाकाराने वेळीच खबरदारी घेतल्याने पुढील मोठा अनर्थ टळला, या कर्मचारी विभागाने माती, पाणी आणि आग विझवणारे यंत्राचा वापर केल्याने कारला लागलेली आग विझवून पर्यटकांच्या वाहनांचे मोठे नुकसान होण्यापासून वाचवले आहे.

डोंबिवली येथून तीन तरुण पर्यटक हे आपल्या खाजगी वाहन घेवून जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असणाऱ्या थंड हवेचे ठिकाण माथेरान फिरण्यासाठी आले होते. दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हे तरुण वळणावळणाचा अवघड घाट चढून माथेरान दस्तुरी नाका येथे वाहन पार्किंग ठिकाणी पोहचले होते. अचानक कारच्या पुढील इंजिन बाजूकडील बोनंट खालून धूर निघण्यास सुरुवात झाली असता तरुणांनी कार थांबवली आणि भीतीने बाजूला झाले. दरम्यान, येथील वनबीभग कर्मचारी, पोलीस विभाग तर स्थानिक तरुणांनी गाडीचा बोनंट खोलला असता इंजिन बाजूला आगीने पेट घेतला होता. वेळीच येथील कर्मचारी यांनी आग विझवण्यासाठी असलेले साहित्य वापरून तर माती आणि नंतर पाण्याचा वापर करून आगीवर नियंत्रण मिळवले होते.

एकूणच स्थानिक तरुण आणि शासकीय कर्मचारी यांनी दाखवली कार्यतत्परता यामुळे येथील पर्यटकांचे वाहनांचे मोठे नुकसान होता टळले. फोर्ड या कंपनीची ही महागडी पेट्रोल कार असून वाहनांचा वायरमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली असावी असा अंदाज या वेळी वाहनचालकांनी व्यक्त केला.

# रोह्यात पंचायत समितीतर्फे अमृत कलश शोभायात्रा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा पंचायत समितीच्या वतीने रोहा शहरात मंगळवारी (दि. १०) मेहेंदळे हायस्कूल ते रोहा पंचायत समिती पर्यंत अमृत कळस शोभा यात्रा काढण्यात आली. तालुक्यातील ग्रामपंचायतमधील अमृत कलश रोहा पंचायत समिती येथे एकत्रीत करण्यात आले.




या अमृत कळस शोभायात्रेत रोहा पंचायत समिती सहाय्यक गटविकास अधिकारी महारुद्र फडतरे, सहाययक प्रशासन अधिकारी श्री वारगे, विस्तार अधिकारी सुनील गायकवाड, गट शिक्षण अधिकारी मेघना धायगुडे, विस्तार अधिकारी श्री लवटे, पी.पी. सावंत, रिद्धी बोथरे, मेहंदळे हायस्कूलचे शिक्षक वर्ग, विद्यार्थी, पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी, महिला वर्ग उपस्थित होते.

# स्टॅन्डअप इंडिया योजनेचा लाभ घ्या

**अलिबाग** : केंद्र शासनाने स्टॅन्डअप इंडिया ही योजना घोषित केली आहे. यात अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकातील नवउद्योजक लाभार्थ्यांना मार्जिन मनी उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत योजना सुरू करण्यात आली आहे.


**महावितरण** — **ई-निविदा सूचना**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-९० आणि टी-९१/(२०२३-२४) अशा एकुण दोन निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी दि. ११.१०.२०२३ पासून ते दि. १७.१०.२०२३ पर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीखदि. १८.१०.२०२३ ला दुपारी १.०० वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत / तारखा / इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले गाईल.

(सही)
**कार्यकारी अभियंता (स्था.)**
**स्थापत्य विभाग, भांडुप**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळवीण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री. विष्णु बाळाराम पाटील यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वारदोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे / गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| १७ | ४ / क<br>पो. ख | ०हे - ३१ आर-४० पॉ.<br>०हे - ०३ आर-५० पॉ. | ७ - २५ |
| | **एकूण क्षेत्र** | **० हे - ३४ आर - ९० पॉ** | |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ, अथवा, अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '७' दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहित व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. विजय रामराव सुरडकर,**
**ठि.: पनवेल** **पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६,
**दि. 11/10/2023** सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :9870099284**


# अलिबाग येथे राज्यस्तरीय पोषण महिन्याची सांगता



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागामार्फत अलिबाग येथील राज्यस्तरिय पोषण माह सांगता सोहळयामध्ये पोलादपूर तालुक्यातील बाल विकास प्रकल्पअधिकारी माधुरी फड, पर्यवेक्षिका गीता उतेकर आणि सुविधा संतोष मिरगल तसेच कापडे बुद्रुक येथील अंगणवाडी सेविका विमल जगदाळे व अंगणवाडी मदतनीस शुभांगी कासार आदींनी विविध पुरस्कार प्राप्त केले.

अंगणवाडी उपायुक्त विजय क्षीरसागर, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, राजिप मुख्य लेखाअधिकारी राहुल कदम, महिला व बालविकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी होरायझन हॉल येथे आयोजित राज्यस्तरिय पोषण माह सांगता सोहळयात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी पोलादपूर बालविकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी माधुरी फड, पर्यवेक्षिका गीता उतेकर आणि सुविधा संतोष मिरगल यांनी १००टक्के मोबाईल व्हेरिफिकेशन पुरस्कार प्राप्त केले. यासोबतच, उत्कृष्ट प्रकल्प अधिकारी पुरस्कार माधुरी फड आणि आदर्श पर्यवेक्षिका पुरस्कार गीता उतेकर आणि सुविधा संतोष मिरगल यांना प्रदान करण्यात आला. या वेळी आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार कापडे बुद्रुक येथील विमल जगदाळे व आदर्श अंगणवाडी मदतनीस पुरस्कार चरई येथील शुभांगी कासार यांना राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

# 'परीक्षे पे चर्चा'मध्ये मुख्याध्यापिका योगिनी देशमुख यांचा सहभाग

**धाटाव : प्रतिनिधी**



एम.डी.एन. फ्युचर स्कूल वरसगाव कोलाडच्या मुख्याध्यापिका योगिनी प्रशांत देशमुख यांनी परीक्षे पे चर्चा कार्यक्रमात महत्वपूर्ण सहभाग घेऊन चांगले सादरीकरण केले आहे. त्यांचे सादरीकरण व व्यक्त केलेल्या मतप्रदर्शनावर पंतप्रधान कार्यालयाकडून दखल घेण्यात आली असून योगिनी देशमुख यांना मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सही असलेले पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयोजित केलेल्या परीक्षे पे चर्चा या कार्यक्रमात सहभाग दर्शवून योगिनी प्रशांत देशमुख यांनी महत्वपूर्ण सादरीकरण केले. या कार्यक्रमात संपुर्ण देशभरातून शिक्षण क्षेत्रातील नामवंत शिक्षक बंधू आणि भगिनी सहभागी झाल्या होत्या. यामध्ये आपल्या महाराष्ट्र राज्यातून व रायगड जिल्ह्यातून सौ. योगिनी देशमुख यांनी सहभाग घेऊन सद्य परिस्थितीतील शिक्षण, देश व विद्यार्थी याबाबत चांगले मतप्रदर्शन करून या कार्यक्रमात दखलपात्र राहिल्या. त्यांचे सादरीकरण व व्यक्त केलेल्या मतप्रदर्शनावर प्रभावित होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शाबासकी देत पंतप्रधान कार्यालयाकडून योगिनी देशमुख यांना उत्तम आरोग्यासाठी व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सही असलेले पत्र नुकतेच मिळाले आहे.

# 'पेन्शनधारकांनी संघटित होणे आवश्यक'

**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

निवृत्त सेवक संघटना नागोठणे विभाग नागोठणे यांच्या वतीने विभागीय अध्यक्ष दत्ताराम महादेव झोलगे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (दि. ७) आयोजित करण्यात आलेल्या मासिक सभेत पनवेल कोषाध्यक्ष व रायगड जिल्हा पेन्शन असोसिएशन कार्यकारीणी सदस्य काशिनाथ लक्ष्मण जाधव यांचे पेन्शन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

त्यांनी भाषणात निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन, निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण, सेवाउपदान, मृत्यू व सेवाउ पदान, याबाबतची तपशीलवार माहिती सांगितली, पेन्शन धारकांनी विचारलेल्या सर्व शंकांचे निरसन केल्याने पेन्शन धारकांनी समाधान व्यक्त केले. पेन्शन धारकांनी आपल्या हक्कासाठी संघटित होऊन काही अडचण आल्यास ९२२२११९४९७वर संपर्क करण्यास सांगितले.

# श्री समर्थ बैठकीच्या निरंतर सेवेची ८० वर्षे पूर्ण

**नागोठणे : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील निरुपणकार डॉ नानासाहेब धर्माधिकारी यांनी समाजातील लोकांचे अज्ञान व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी मुंबईतील गोरेगाव येथून केवळ पाच श्री सदस्यांच्या सोबतीने ८ ऑक्टोबर १९४३ रोजी श्री समर्थ प्रासादिक बैठकीची सुरुवात केली होती. ८ ऑक्टोबर २०२३ रोजी या श्री समर्थ प्रसादिक बैठकीच्या आध्यात्मिक निरुपणाच्या निरंतर सेवेला ८०वर्ष पूर्ण झाली असून आज जगभरात त्यांचे कोट्यावधी अनुयायी श्री सदस्य आहेत.



श्रीमत् दासबोधाचे निरूपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी आयुष्यभर शिक्षण, आरोग्य, समाज प्रबोधन व व्यसनमुक्ती आणि अंधश्रद्धा आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. त्यांनी समाजातील विविध ठिकाणच्या तळागाळातील गोरगरीब अज्ञानी जनतेचे अंधारमय जीवन प्रकाशात आणले. त्यांच्यात सदाचार,शिस्त, सद्गुण, सद्विवेक, सद्बुद्धी हे गुण अंगिकारले. त्यांच्या या विशाल कार्यामुळे त्यांना मरणोत्तर महाराष्ट्र भूषण पुरस्कारांनी गौरविण्यात आले. निरुपणकार डॉ नानासाहेब धर्माधिकारी यांनी सुरू केलेल्या या समाज परिवर्तनवादी कार्याचा वारसा आज त्यांचे पुत्र तीर्थरूप डॉ. आप्पासाहेब व नातू डॉ. सचिनदादा धर्माधिकारी निरंतर जपत आहेत.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ५९/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक १३/०९/२०२३ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक खबरें आज तक, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | विळे भागड औद्योगिक क्षेत्र.. विळेभागड औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्रामधून रायगड जिल्हा, माणगाव तालुक्यातील कडपे, कडपेवाडी, कांदळगाव, बांदलवाडी, निजामपूर, कोष्टे (ख) गावांना पाणीपुरवठा करण्याकरीता मृदू पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करणे. |

सदर कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १७/१०/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतक कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# आज भारत-अफगाणिस्तान सामना



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियावर विजय मिळविल्यानंतर भारतीय संघाचा दुसरा सामना बुधवारी (दि. ११) अफगाणिस्तान संघासोबत आहे. या सामन्यातही विजय मिळवून गुण वाढविण्याची भारताला संधी आहे. हा सामना दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर होणार आहे.

अफगाणिस्तानविरुद्धच्या पुढील सामन्यात डावखुरा यष्टिरक्षक फलंदाज इशान किशन शुबमन गिलच्या जागी रोहित शर्मासोबत पुन्हा एकदा सलामी करताना दिसू शकतो. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात इशाननेही सलामी दिली होती, मात्र त्याला खातेही उघडता आले नाही. त्याने आतापर्यंत २६ सामने खेळले आहेत. या काळात त्याची सरासरी ४४च्या आसपास आहे. इशानच्या नावावर ८८६ धावा आहेत. त्याने एक शतक आणि सात अर्धशतके केली आहेत. इशानने या वर्षी तीन अर्धशतके झळकावली आहेत.

## शुबमन गिल रुग्णालयात दाखल



**चेन्नई :** भारतीय संघाचा युवा सलामीवीर फलंदाज शुबमन गिल याला डेंग्यूच्या उपचारासाठी चेन्नईतील रुग्णालयात दाखल करावे लागले आहे. गिल हा वर्ल्डकप स्पर्धेतील ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यातही खेळू शकला नव्हता आणि अफगाणिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यातूनही तो बाहेर पडला होता.

गिलाला डेंग्यूमधून पूर्णपणे बरे होण्यासाठी आणखी काही कालावधी लागणार असल्याचे मानले जात आहे. अशा परिस्थितीत तो भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय व्होल्टेज सामन्यातही खेळू शकणार नाही. गिलला शहरातील कावेरी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याआधी रविवारी टीम इंडिया हॉटेलमधून एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये खेळण्यासाठी गेली तेव्हा गिल संघासोबत नव्हता. तो हॉटेलमध्ये थांबला होता. क्रिकेट वेबसाईट क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार सोमवारी गिलच्या रक्त तपासणीत कमी प्लेटलेट काउंट आढळले. त्यानंतर त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उर्वरित भारतीय संघ सोमवारीच नवी दिल्लीला रवाना झाला, जिथे बुधवारी अफगाणिस्तानविरुद्ध सामना खेळायचा आहे.

# मलेशियातील खो-खो मालिकेसाठी महाराष्ट्रातील चार खेळाडूंची निवड

**मुंबई : प्रतिनिधी**

खो-खो आता भारतातच नव्हे; तर परदेशातसुद्धा जोमाने खेळला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर विविध देशांमध्ये वेगवेगळ्या वयोगटांच्या स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्याचाच भाग म्हणून मलेशियात १२ ते १५ ऑक्टोबरदरम्यान कुमार मुली गट खो-खो कसोटी मालिका होत असून यासाठी महाराष्ट्रातील चार खेळाडूंची निवड झाली आहे.



भारतीय खो-खो महासंघाचे सचिव एम. एस. त्यागी यांनी देशाचा संघ जाहीर केला असून त्यात महाराष्ट्राच्या किरण वसावे (धाराशिव) व निखिल सोडिये (मुंबई उपनगर) यांची मुलांच्या गटात, तर संपदा मोरे (धाराशिव) व प्रीती काळे (सोलापूर) (पंढरपूर) यांची मुलींच्या गटात निवड झाली आहे.

मुलांच्या प्रशिक्षकपदी छत्रपती संभाजीनगरच्या विकास सूर्यवंशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सूर्यवंशी हे एनआयएस प्रशिक्षक, राष्ट्रीय खेळाडू, राष्ट्रीय पंच व राष्ट्रीय प्रशिक्षक आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्हा खोखो संघटनेचे ते सचिवही आहेत. भारतीय खो-खो महासंघाचे सहसचिव डॉ. चंद्रजीत जाधव (धाराशिव) यांची स्पर्धेच्या तांत्रिक संचालकपदी निवड झाली आहे.

महाराष्ट्रातील खेळाडू व पदाधिकारी यांच्या झालेल्या निवडीबद्दल त्यांचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक-निंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, सरचिटणीस गोविंद शर्मा, खजिनदार अरुण देशमुख यांनी अभिनंदन केले आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सेपकटकरा स्पर्धेत रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे सुयश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने मुलांच्या जिल्हास्तरीय सेपकटकरा स्पर्धेचे आयोजन नुकतेच कळंबोलीतील न्यू इंग्लिश स्कूल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने सुयश प्राप्त केले आहे.



सेपकटकरा हा क्रीडा प्रकार फुटबॉल व व्हॉलिबॉलचे मिश्रण असून त्याचे विशिष्ट नियम आहेत. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी १९ वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक आणि १७ वर्षाखालील गटात व्दितीय क्रमांक पटकाविला. १९ वर्षाखालील गटाची निवड पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे. या संघात दिग्विजय नेटके, जीवन बराई, उदयन शिंदे, वेदांत यादव, अभय सिंग यांचा समावेश होता, तर १७ वर्षाखालील संघात हमजामुल्ला, गुरुमेहक रंधवा, कार्तिकेय नेगी, हर्षितनाईक, राजदीप धामी हे विद्यार्थी होते. या सर्वांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्या निशा नायर व प्राध्यापकवर्गाने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# न्यूझीलंडचा सलग दुसरा विजय

## दुबळ्या नेदरलँड्सवर दणदणीत विजय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सोमवारी न्यूझीलंडने नेदरलँडचा ९९ धावांनी पराभव केला. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर नेदरलँडचा कर्णधार स्कॉट एडवर्ड्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने ५० षटकांत सात विकेट गमावून ३२२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात नेदरलँडचा संघ सर्वबाद २२३ धावांवर आटोपला. या विश्वचषकात न्यूझीलंडचा हा दुसरा विजय आहे. त्यांनी पहिल्या सामन्यात इंग्लंडचा पराभव केला होता.

नेदरलँड्सकडून कॉलिन अकरमनने सर्वाधिक ६९ धावा केल्या, तर स्कॉट एडवर्ड्सने ३० आणि सायब्रँड एंजेलब्रेक्टने २९ धावा केल्या. न्यूझीलंडचा अनुभवी फिरकी गोलंदाज मिचेल सँटनरने पाच विकेट्स घेतल्या. मॅट हेन्रीला तीन गडी करण्यात यश मिळाले, तर रचिन रवींद्रने एक विकेट घेतली. पाच विकेट्स घेणाऱ्या सँटनरला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

तत्पूर्वी न्यूझीलंडकडून तीन फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. विल यंगने ७०, टॉम लॅथमने ५३ आणि रचिन रवींद्रने ५१ धावा केल्या. याशिवाय डेरिच मिशेलने ४८ धावांचे, मिचेल सँटनरने नाबाद ३६ आणि डेव्हन कॉनवेने ३२ धावांचे योगदान दिले. मॅट हेन्री १० धावा करून नाबाद राहिला. मार्क चॅपमनने पाच आणि ग्लेन फिलिप्सने चार धावा केल्या. नेदरलँड्सकडून आर्यन दत्त, पॉल व्हॅन मीकरेन आणि रीलोफ व्हॅन डर मर्वे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले, तर बास डी लीडे या एक विकेट मिळाली.

या स्पर्धेतील किवी संघाचा हा सलग दुसरा विजय आहे. गुणतालिकेत त्यांचे आता दोन सामन्यांतून चार गुण झाले असून ते पहिल्या स्थानावर कायम आहेत. दुसरीकडे नेदरलँडचा हा सलग दुसरा पराभव आहे. हैदराबादमध्येच गेल्या सामन्यात पाकिस्तानने त्यांचा पराभव केला होता.

# उरणचा नेमबाज गौरव ठाकूर राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाचा विद्यार्थी गौरव जगदीश ठाकूर याने अंबरनाथ येथे झालेल्या विद्यापीठस्तरीय एअर पिस्टल नेमबाजी स्पर्धेत कांस्यपदक पटकाविले, तर मुंबई शहर विभागाच्या चार विद्यार्थ्यांच्या संघाने गौरवच्या नेतृत्वाखाली सुवर्णपदक फटकाविले. या चमकदार कामगिरीमुळे तो भारतातील सर्व विद्यापीठांच्या राष्ट्रीय विद्यापीठीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

चिरनेरचा गौरव सध्या तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गात शिकत आहे. या वर्षी गुजरातमधील अमदाबाद येथे झालेल्या १० मीटर ज्युनियर नेमबाजी प्रकारात गौरव राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. उपप्राचार्य व जिमखाना प्रमुख डॉ. व्ही. एस. महाले व प्रा. देवेंद्र कांबळे यांचे त्याला सरावासाठी  मार्गदर्शन लाभले.

या नेत्रदीपक कामगिरीबद्दल त्याचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष पी जे पाटील, भावना घाणेकर, सुधीर घरत, प्राचार्य डॉ. पी. जी. पवार तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मोहोपाड्यात डब्ल्यूपीएलसाठी ऑक्शन सोहळा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील अचानक मैदानावर दिवाळीनंतर १५ ,१६,१७ डिसेंबर रोजी वासांबे प्रीमियर लीगचे दुसरे पर्व रंगणार आहे. या संदीप मुंढे पुरस्कृत क्रिकेट स्पर्धेचा ऑक्शन सोहळा जनता शाळेच्या सभामंडपात आयोजित करण्यात आला होता.

ऑक्शन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.प.ग.पळणीटकर, रसायनी पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर, ग्रामसुधार मंडळाचे उपाध्यक्ष सुदाम मुंढे, तुळसीदास पाटील, जनता शाळेचे मुख्याध्यापक वारे, 'रोटरी'चे माजी अध्यक्ष अमित शाह, माजी प्रभारी सरपंच दत्तात्रेय शिंदे, दिलीप पारंगे आणि संघ मालक उपस्थित होते. या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते होंडा सुपर स्प्लेंडर बाईकचे अनावरण करण्यात आले.


डब्ल्यूपीएलमध्ये वासांबे विभागातील एनडीजे विनीत इलेव्हन कांबे, यश युवराज इलेव्हन चांभार्ली, बल्लाळेश्वर आळी अंबिवली, कैवल्य मंथन इलेव्हन मोहोपाडा, श्री गणेश इलेव्हन गणेशनगर, राजवाड्याचा राजा नवीन पोसरी, कपिल एंटरप्रायझेस रिस, आई टाकेदेवी रिसवाडी, विघ्नेश इलेव्हन वरोसे, अनन्या एंटरप्रायझेस तळेगाववाडी, २८८ ओम साई आई एकविरा लोधिवली आणि श्री मल्लिकार्जून खाने अंबिवली या १२ संघांचा समावेश आहे.

प्रथम क्रमांक विजेत्या संघास एक लाख १११ रुपये, द्वितीय ५० हजार ११ रुपये, तृतीय २५ हजार एकशे अकरा रुपये आणि तिन्ही विजेत्यांना भव्य चषक देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे वैयक्तिक पारितोषिके आहेत. याशिवाय स्पर्धेच्या तीन दिवसांत लक्की ड्रा असणार आहे. या सोहळ्याचे सूत्रसंचालन टी. के. माळी व संतोष चौधरी यांनी केले.

# नेदरलँड्स क्रिकेट संघात तीन खेळाडू भारतीय वंशाचे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नेदरलँड्सचा संघ प्रदीर्घ कालावधीनंतर वर्ल्डकपमध्ये सहभागी होतो आहे. ऑरेंज आर्मी अशी बिरुदावली मिरवणाऱ्या या संघात तीन भारतीय वंशाचे खेळाडू खेळत आहेत.



पाकिस्तानविरुद्धच्या लढतीत नेदरलँड्सचा सलामीवीर विक्रमजीत सिंगने आपल्या दमदार खेळाने चाहत्यांना प्रभावित केले. डावखुऱ्या पंजाब दा पुत्तरने आपल्या खेळाच्या बळावर वाहवा मिळवली. दक्षिण आफ्रिकेचा सलामीवीर फलंदाज आणि विकेटकीपर क्विंटन डी कॉक हा विक्रमजीतसाठी आदर्श आहे.

विक्रमजीत पंजाबमधल्या जालंधरजवळच्या चीमा खुर्द गावचा. विक्रमजीत अवघ्या तीन चार वर्षांचा असताना त्याच्या कुटुंबीयांनी नेदरलँड्सला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. १९८०च्या दशकात पंजाबमध्ये निर्माण झालेल्या अस्थिर वातावरण पाहून विक्रमजीतच्या आजोबांनी नेदरलँड्सला रवाना होण्याचा निर्णय घेतला. विक्रमजीतचे वडील हरप्रीत नेदरलँड्समध्ये ट्रान्सपोर्ट कंपनी चालवतात. हरप्रीत पाच वर्षांचे असताना नेदरलँड्सला आले. त्यांना त्रासालाही सामोरे जावे लागले.

विक्रमजीतचे वडील हरप्रीत हेच त्याचे पहिले प्रशिक्षक. ते स्वत:ही खेळायचे. गेल्याच वर्षी विक्रमजीतने वनडे पदार्पण केले. वर्ल्डकपसाठी झिम्बाब्वेत आयोजित पात्रता फेरी स्पर्धेत त्याने यजमान झिम्बाब्वे आणि नंतर वेस्ट इंडिजविरुद्ध महत्त्वपूर्ण खेळी साकारल्या. अमित उनियाल यांच्या चंदीगढ इथल्या गुरुसागर क्रिकेट अकादमीतही विक्रमजीत सराव करतो. गेले दोन वर्ष विक्रमजीत बरेच महिने सरावासाठी जालंधर इथेच होता.

तेजा निधामानुरू हे दाक्षिणात्य नाव नेदरलँड्सच्या संघात आवर्जून दिसेल. आंध्र प्रदेशमधल्या विजयवाडा इथे तेजाचा जन्म झाला. अगदी लहान वयात आई-वडिलांबरोबर तो न्यूझीलंडला रवाना झाला. तिथे ऑकलंडसाठी डोमेस्टिक क्रिकेट खेळू लागला. पुढे पालक विभक्त झाले. आईने भारतात परतण्याचा निर्णय घेतला. तेजा न्यूझीलंडमध्येच राहिला. त्याने क्रिकेट आणि शिक्षण असे दोन्ही सांभाळले, पण न्यूझीलंडमध्ये चांगली स्पर्धा असल्यामुळे राष्ट्रीय संघासाठी खेळणे त्याला कठीण वाटू लागले. स्पोर्ट्स मॅनेजमेंट आणि मार्केटिंगमध्ये त्याने शिक्षण पूर्ण केले. बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर म्हणून त्याला नेदरलँड्समध्ये नोकरी मिळाली. त्याची क्रिकेटची आवड स्वस्थ बसू देईना. पंजाब रॉटरडॅम क्लबसाठी तो खेळू लागला. इंग्लंडमधल्या डरहॅम क्लबसाठीही खेळला. यातूनच त्याचं नेदरलँड्ससाठी खेळायचे स्वप्न पूर्ण झाले. वर्ल्डकपसाठीच्या पात्रता फेरी स्पर्धेत तेजाने वेस्ट इंडिजविरुद्ध झुंजार शतक झळकावले. नेदरलँड्सला वर्ल्डकपचे तिकीट मिळवून देण्यात तेजाची भूमिका मोलाची आहे.

आर्यन दत्त पहिल्यांदाच भारतात खेळणार आहे. पंजाबमधील होशियारपूर हे आर्यनचे गाव. आर्यन आठ वर्षांचा असताना त्याच्या पालकांनी नेदरलँड्सला जाण्याचा निर्णय घेतला. फिरकीपटू आर्यन सरावाच्या निमित्ताने चंदीगढला सातत्याने येत असतो.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com